## नॅशनल हेराल्डवरील निर्णय तिसऱ्यांदा पुढे

**■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २९ :**
नॅशनल हेराल्ड प्रकरणात दिल्लीच्या राऊस ॲव्हेन्यू कोर्टाचा निर्णय तिसऱ्यांदा पुढे ढकलण्यात आला आहे. मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात ईडीच्या आरोपपत्राची दखल घ्यावी की नाही, हे कोर्टाला ठरवायचे आहे.
आरोपपत्रात प्रिव्हेंशन ऑफ मनी लॉन्ड्रिंग ॲक्ट अंतर्गत सोनिया गांधी, राहुल गांधी, सॅम पित्रोदा, सुमन दुबे आणि इतर अनेक वरिष्ठ काँग्रेस नेत्यांची नावे आहेत. ईडीने या नेत्यांवर असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड (अखछ) शी संबंधित आर्थिक गैरव्यवहाराचा आरोप केला आहे. ही कंपनीच नॅशनल हेराल्ड वृत्तपत्र प्रकाशित करत होती. कोर्टाने १४ जुलै रोजी युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर २९ जुलैपर्यंत निर्णय राखून ठेवला होता.


नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com








* वर्ष ५१ * अंक १४७ * | * अमरावती * | रविवार, दिनांक ३० नोव्हेंबर २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


## थोडक्यात...

### शाहीनच्या फ्लॅटमधून १८.५० लाख जप्त

**■ फरीदाबाद :** दिल्ली ब्लास्टच्या दहशतवादी मॉड्यूलमध्ये सामील असलेल्या लेडी दहशतवादी डॉ. शाहीन सईदच्या फरीदाबाद येथील अल-फलाह युनिव्हर्सिटीच्या फ्लॅटमधून राष्ट्रीय तपास यंत्रणेला १८.५० लाख रोख रकमेसह सोन्याचे बिस्किटे आणि काही दागिने मिळाले आहेत. कपाटातून अरब देशांची इतर चलनेही मिळाली आहेत.
तपास यंत्रणेने फ्लॅटमधील कपाटाचे कुलूप उघडले असता, आत एक गुप्त लॉकर सापडला. तो उघडल्यावर आत अनेक पाकिटे ठेवलेली होती. टीमच्या सदस्यांनी मशीनशिवाय या नोटा मोजल्या तेव्हा त्या १८.५० लाख रुपये झाल्या.

### श्रीलंकेतील मृत्यूसंख्या पोहचली १२३ वर

**■ कोलंबो :** श्रीलंकेत 'दितवाह'मुळे आलेल्या पूर आणि भूस्खलनामुळे १२३ हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. १३० हून अधिक लोक बेपत्ता आहेत.
चेन्नईची विमानांची उड्डाणे रद्द झाल्यामुळे कोलंबो विमानतळावर सुमारे ३०० भारतीय प्रवासी गेल्या तीन दिवसांपासून अडकले आहेत. हे सर्व दुबईहून श्रीलंकेमार्गे भारतात येणार होते.
श्रीलंकेत विध्वंस घडवल्यानंतर 'दितवाह' चक्रीवादळ भारताच्या दिशेने वेगाने सरकत आहे. तामिळनाडू, आंध्र प्रदेश आणि पुद्दुचेरीच्या किनारी भागांत जोरदार वाऱ्यांसह मुसळधार पाऊस सुरू झाला आहे. शनिवारी संध्याकाळपर्यंत ते आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे.
तामिळनाडूमध्ये मुसळधार पावसामुळे चेन्नईतील ५४ विमानांची उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. पुद्दुचेरी सेंट्रल युनिव्हर्सिटीने चक्रीवादळामुळे शनिवारी सुट्टी जाहीर करून सर्व परीक्षा पुढे ढकलल्या आहेत. पुद्दुचेरी, कराईकल, माहे आणि यनममधील सर्व शाळा आणि महाविद्यालये सोमवारपर्यंत बंद राहतील.

### प्रत्येक खाजगी, अभिमत विद्यापीठाचे ऑडिट होणार

**■ नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने देशभरातील खाजगी आणि अभिमत विद्यापीठांचे ऑडिट करण्याचे आदेश दिले आहेत. यामध्ये न्यायालयाने केंद्र सरकार, सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश तसेच वत्रक्ष म्हणजेच विद्यापीठ अनुदान आयोगाला या ऑडिटनंतर वैयक्तिकरित्या स्वाक्षरी केलेले प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले आहेत.
विद्यापीठांची स्थापना कशी झाली, त्यांचे नियंत्रण कोण करते, त्यांना कोणत्या प्रकारचे नियामक परवाने (रेग्युलेटरी अप्रुव्हल्स) दिले आहेत आणि ही विद्यापीठे खरोखरच 'नॉट-फॉर-प्रॉफिट' तत्वावर चालतात का - ही सर्व माहिती प्रतिज्ञापत्रात सामायिक करावी लागेल.

## सावरकर मानहानी प्रकरण

# पुराव्यांची सीडी ब्लँक

### राहुल गांधींविरोधातील खटल्यात सावळा गोंधळ : वकिलाची बोबडी वळली

**■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २९ :**
स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा कथित अवमान केल्याप्रकरणी लोकसभेतील विरोधी पक्षनेते तथा काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्याविरोधात सादर करण्यात आलेली पुराव्यांची सीडी ब्लँक निघाल्यामुळे एकच खळबळ माजली आहे.
हा प्रकार गुरुवारच्या सुनावणीत घडला. पण तो आज समोर आला. या घटनेमुळे या प्रकरणी राहुल गांधींना कोर्टात खेचण्याच्या प्रयत्नांना मोठी खिळ बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.
राहुल गांधी यांनी २०१९ मध्ये लंडनमध्ये दिलेल्या एका मुलाखतीत विनायक दामोदर सावरकर यांच्याविषयी एक कथित वादग्रस्त विधान केले होते. या प्रकरणी सावरकरांचे पणतू सत्यकी सावरकर यांनी त्यांच्या विरोधात मानहानीचा खटला दाखल केला होता. त्यांनी राहुल यांच्या भाषणाचे रेकॉर्डिंग असलेली एक सीडी सीलबंद लिफाफ्यात कोर्टात सादर केली होती.
याच सीडीच्या आधारावर कोर्टाने राहुल गांधी यांच्याविरोधात समन्स जारी केला होता. गुरुवारी न्यायदंडाधिकारी अमोल शिंदे यांच्यापुढे सत्यकी सावरकर यांची मुख्य उलटतपासणी सुरू होती. त्यात ही सीडी मुख्य पुरावा म्हणून सादर करण्यात आली.
यावेळी कोर्टाने ही सीडी चालवून पाहण्याचे आदेश दिले. त्यानुसार ती उघडून चालवण्याचा प्रयत्न झाला. पण त्यात कोणताही डेटा नसल्याचे निष्पन्न झाले. यामुळे कोर्टरूममध्ये उपस्थित सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला. सीडी कोरी निघाल्याचे पाहून सत्यकी सावरकरांचे वकील संग्राम कोल्हटकर यांनाही आश्चर्याचा धक्का बसला.
त्यांनी कोर्टाला आठवण करून दिली की, याच सीडीच्या आधारावर कोर्टाने राहुल गांधींविरोधात कारवाई सुरू केली होती. त्यानंतर त्यांनी कोर्टाला यूट्यूबवर राहुल गांधींचे ते कथित भाषण लावण्याची परवानगी मागितली. पण कोर्टाने त्यांची विनंती साफ फेटाळून लावली.



न्यायदंडाधिकारी अमोल शिंदे या प्रकरणी म्हणाले, ही यूआरएल भारतीय पुरावा अधिनियम कलम ६५-ब अंतर्गत आवश्यक असलेल्या प्रमाणपत्रांसह सादर करण्यात आला नाही. त्यामुळे तो पुरावा म्हणून स्वीकारार्ह नाही. इलेक्ट्रॉनिक रेकॉर्ड पुरावा म्हणून कोर्टात ग्राह्य धरण्यासाठी कलम ६५ ब नुसार प्रमाणीकरण प्रमाणपत्र आवश्यक असते.
त्यानतंर वकील कोल्हटकर यांनी आणखी २ अतिरिक्त सीडी सादर करून कोर्टाला त्या तपासण्याची विनंती केली. पण राहुल गांधी यांच्या वकिलांनी त्याला कडाडून विरोध केला. त्यावर कोर्ट म्हणाले की, रेकॉर्डमध्ये अशा कोणत्याही अतिरिक्त सीडीचा उल्लेख नाही. त्यामुळे कोल्हटकर यांचा अतिरिक्त सीडी चालवण्याचा अर्जही नामंजूर करण्यात आला.
त्यावर कोल्हटकर यांनी कोऱ्या सीडीच्या रहस्याची न्यायिक चौकशी करण्याची मागणी करत सुनावणी पुढे ढकलण्याची विनंती केली. त्यानुसार कोटार्ने ही सुनावणी काही काळासाठी स्थगित केली.
दरम्यान, प्रस्तुत प्रकरणात महत्त्वाचा पुरावा म्हणून सादर करण्यात आलेली सीडी ब्लँक निघाल्यामुळे तथा यूट्यूब लिंक व अतिरिक्त सीडी चालवण्याची मागणी फेटाळल्यामुळे राहुल गांधी यांना कोर्टात खेचण्याचा सत्यकी सावरकर यांना जोरदार झटका बसला असून, राहुल गांधींसाठी हा दिलासा आहे.

## मनपा, जि.प. निवडणुका ५०% आरक्षण मर्यादेत घ्या

**■ महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २९ :**
सुप्रीम कोर्टाने दिलेल्या आदेशामुळे राज्यातील ३४ जि. प., २९ मनपा निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. १७ जिल्हा परिषद तसेच चंद्रपूर, नागपूर मनपाने ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली आहे. तेथे अजून निवडणूक प्रक्रिया सुरू झालेली नाही. त्यामुळे तेथे पुन्हा आरक्षण प्रक्रिया करून ५० टक्क्यांची मर्यादा पाळत निवडणूक घ्या, असे सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती बागची यांनी स्पष्ट केले.
५० टक्के मर्यादा ओलांडणाऱ्या आणि सध्या निवडणूक प्रक्रिया सुरू असलेल्या ५७ स्थानिक स्वराज्य संस्थांचा निकाल अंतिम निर्णयाधीन असेल, असेही कोटाने सांगितले. ओबीसी आरक्षणाविषयी अंतिम निर्णय घेण्याविषयी २१ जानेवारीला सुनावणी होणार आहे. कोर्टाच्या निर्णयाने महायुतीला दिलासा मिळाला तर काँग्रेसने टीका केली आहे.
ज्या नगर परिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुका जाहीर आहेत, त्या ठरलेल्या वेळापत्रकानुसार होतील. एकूण आरक्षण ५०% पेक्षा जास्त असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांचे निकाल अंतिम निर्णयावर अवलंबून राहतील.
५० पेक्षा जास्त आरक्षण असलेल्या ४० नगर परिषद आणि १७ नगरपंचायतींवर या निकालाचा तत्काळ परिणाम होईल. तेथील निकाल सुप्रीम कोटार्तील अंतिम निकालावर अवलंबून राहणार आहे. त्यामुळे या निकालात कुणालाही पूर्ण दिलासा नाही.
१७ जिल्हा परिषद आणि नागपूर, चंद्रपूर महापालिकेत ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडल्याची कबुली निवडणूक आयोगानेच दिली आहे. त्यामुळे तेथे पुन्हा आरक्षण प्रक्रिया करून निवडणूक घेतली जाईल. उर्वरित जि.प., महापालिकांच्या आरक्षणात कोणताही बदल होणार नाही.

## भारतीय अर्थव्यवस्थेने ट्रम्प टेरिफला हरवले; जीडीपीत ८.२ टक्के वाढ

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९ :**
२०२५-२६ च्या दुसऱ्या तिमाहीत (जुलै-सप्टेंबर) भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास दर ८.२% होता. मागील आर्थिक वर्षातील याच तिमाहीपेक्षा (५.६%) हा दर लक्षणीय जास्त आहे. ही वाढ सलग तिमाहींत सुरू असलेल्या गतीचे मजबूत संकेत आहे.
ही वाढ दोन कारणांसाठी लक्षणीय आहे. पहिले म्हणजे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी २७ ऑगस्ट रोजी भारतावर ५०% कर लादला. तरीही, त्याचा जीडीपीवर कोणताही नकारात्मक परिणाम झाला नाही. दुसरे म्हणजे, जीएसटी सूट २२ सप्टेंबर रोजी लागू झाली. त्याचा पूर्ण परिणाम ऑक्टोबर-डिसेंबरमध्ये दिसून येईल. तिसऱ्या तिमाहीतही उत्सवी हंगामाची वाढ दिसून येईल. दुसऱ्या तिमाहीत वास्तविक जीडीपी ४८.६३ लाख कोटी होता, जो गेल्या वर्षीच्या ४४.९४ लाख कोटी होता.



नाममात्र जीडीपी ८.७% वाढून ८५.२५ लाख कोटी झाला. मुख्य आर्थिक सल्लागार व्ही.ए. नागेश्वरन म्हणाले की, चालू वर्षात जीडीपी वाढ ७% असेल. पहिल्या ६ महिन्यांत ८% कामगिरी झाल्यास अर्थव्यवस्था ४ ट्रिलियन डॉलर्सपुढे जाऊ शकते.
ईव्ही बॅटरी, सौर पॅनल, स्वच्छ तंत्रज्ञान क्षेत्रात उत्पादन वाढले आहे. सप्टेंबरमध्ये वाढ २८.७% होती. मोटार वाहने, ट्रेलर व अर्ध-ट्रेलरचे उत्पादन १४.६% ने वाढले. धातूंच्या मागणीत वाढ झाल्याने या क्षेत्राचे उत्पादन १२.३% होते. जीडीपीमध्ये उत्पादनाचा वाटा १६% आहे.सेवा क्षेत्र ९.२% वाढले आहे. जीडीपीमध्ये त्याचे योगदान ५५% आहे.

## रूपाली ठोंबरे पाटील 'शिंदे' सेनेच्या वाटेवर

**■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २९ :**
स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा धुराळा उडत असतानाच पुण्याच्या राजकारणात एका मोठ्या भूकंप होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटातील आक्रमक नेत्या रूपाली ठोंबरे पाटील लवकरच शिवसेना शिंदे गटात प्रवेश करण्याच्या तयारीत असल्याचे संकेत मिळत आहेत.
रूपाली ठोंबरे यांनी नुकतीच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सुपुत्र खासदार श्रीकांत शिंदे यांची मुंबईत भेट घेतली. या भेटीनंतर चांगली ऑफर मिळाल्यास मी त्यावर विचार करेल, असे विधान रूपाली ठोंबरे यांनी केले आहे.



## ईडीचे १२ ठिकाणी छापे



**■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २९ :**
स्टेट बँक ऑफ इंडिया युनिव्हर्सिटी रोड शाखेत तब्बल १९.३८ कोटी रुपयांचा लक्झरी कार कर्ज घोटाळा उघड झाल्याने आर्थिक व वित्तीय जगतात खळबळ उडाली आहे. बनावट कागदपत्रांच्या माध्यमातून महागड्या गाड्यांसाठी कर्ज मंजूर करून बँकेची मोठी फसवणूक केल्याचा संशय असून, अंमलबजावणी संचालनालयाने या प्रकरणात धडक कारवाई केली आहे.
ईडीने पुण्यातील १२ ठिकाणी छापेमारी करून लक्झरी गाड्या तसेच महत्त्वाचे दस्तऐवज जप्त केले. तपासात बँकेचे माजी चीफ मॅनेजर अमर कुलकर्णी, ऑटो लोन काउन्सलर आदित्य सेठिया आणि काही निवडक कर्जदार यांचा सहभाग असल्याचे समोर आले आहे.
२०१७ ते २०१९ या कालावधीत बँकेच्या लेंडिंग पॉलिसीचा पूर्णपणे अपमान करून ही कर्जे मंजूर केली गेली. तपासात समोर आले आहे की, अमर कुलकर्णी यांनी निवडक कर्जदारांना मदत करण्यासाठी बनावट व वाढीव किंमतीच्या कोटेशन्स बँकेत सादर केल्या. या फसव्या कोटेशन्सच्या आधारे कारची किंमत प्रत्यक्षापेक्षा जास्त दाखवून कर्जाची रक्कम वाढवण्यात आली, ज्यामुळे बँकेला कोट्यवधींचा थेट तोटा सहन करावा लागला. तपासानुसार काही आरोपींनी पूर्णपणे बनावट कागदपत्रे तयार करून लाखों-कोट्यवधींची कर्जे मंजूर करून घेतली. अनेक प्रकरणांमध्ये प्रत्यक्ष पडताळणी न करता लोन मंजुरी देण्यात आली, ज्यातून बँक अधिकाऱ्यांचे संगनमत स्पष्ट झाले.
तपासात असेही आढळले की, आरोपींनी फसव्या कर्जातून मिळालेली रक्कम महागड्या गाड्या व मालमत्ता खरेदी करण्यासाठी वापरली. या घोटाळ्यामुळे बँक व्यवस्थापनांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

## माजी केंद्रीय मंत्री श्रीप्रकाश जयस्वाल यांचे निधन

**■ वृत्तसंस्था, कानपूर, दि. २९ :**
माजी केंद्रीय गृहराज्यमंत्री आणि ज्येष्ठ काँग्रेस नेते श्रीप्रकाश जयस्वाल यांचे निधन झाले. ते कानपूरमधून सलग तीन वेळा खासदार म्हणून निवडून गेले होते. त्यांनी १० वर्षे केंद्रीय मंत्री म्हणून काम केले.



श्रीप्रकाश जयस्वाल यांनी कानपूरमध्ये काँग्रेसला बळ दिले, तसेच कानपूरमध्ये अनेक मोठे प्रकल्प आणले. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत जयस्वाल यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केले.

## ग्राहकांनी ७ दिवसांत काढले ७० कोटी रुपये

### सीबीआय चौकशीच्या आदेशानंतर निर्मल उज्ज्वलमध्ये खळबळ

**■ महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २९ :**
निर्मल उज्ज्वल को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीतील आर्थिक अनियमिततेच्या आरोपांवर बॉम्बे हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठाने सीबीआय चौकशीचे आदेश दिल्यानंतर संपूर्ण सोसायटीत तुफानी हलकल्लोळ निर्माण झाला आहे.
आदेशांची बातमी समोर येताच सदस्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून अवघ्या एका आठवड्यात ७० कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम लोकांनी काढून घेतली आहे.
चौकशीचा आदेश आल्यानंतर सोसायटीच्या अनेक शाखांमध्ये पैसे काढण्यासाठी सदस्यांची मोठी गर्दी दिसून येत आहे. सोसायटी कधीही आर्थिक संकटात जाऊ शकते, या भीतीने अनेक गुंतवणूकदारांनी आपली संपूर्ण बचत काढण्याची प्रक्रिया सुरु केली आहे.
सोसायटीच्या महाव्यवस्थापक नंदा बांते यांनी कोणतीही घाई किंवा गोंधळ नसल्याचा दावा केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, फक्त चौकशी वाढली आहे; पण स्थिती स्थिर आहे. मात्र प्रत्यक्षात होत असलेली सततची मोठ्या प्रमाणातील निकासी प्रबंधनाच्या दाव्याला विरोध करणारी आहे.
२९ जून २०२३ रोजी केंद्रीय सहकार निबंधकांना पाठवलेल्या पत्रात सोसायटीत १४०० कोटींपेक्षा जास्त रक्कम गुंतवलेली असून मोठ्या गैरव्यवहाराची शक्यता व्यक्त करण्यात आली होती. अवैध व्यवहार, नियमभंग, चुकीची गुंतवणूक यासारख्या आरोपांवरूनच हायकोर्टाने अखेर सीबीआय तपासाचे आदेश दिले.
तत्कालीन पोलिस आयुक्तांनी एफआयआर दाखल करण्यासाठी निबंधकांची परवानगी मागितली होती, मात्र निबंधकांनी कोणत्याही परवानगीची गरज नसल्याचे स्पष्ट सांगूनही पोलिसांनी एफआयआर दाखल करण्यात उशीर केला. कोर्टाने ही ढिलाई गंभीर मानत पोलिसांच्या भूमिकेचीही चौकशीत तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत.
सदस्यांकडून वाढत्या निकासीमुळे सोसायटीला ३० कोटी रुपयांची एफडी मोडावी लागली आहे, ज्यामुळे आर्थिक ताण किती गंभीर आहे हे स्पष्ट झाले आहे. वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी मार्केट टीमवर नवीन ठेवी आणण्याचा दबाव देखील वाढवला आहे.
चौकशी आणि आर्थिक अस्थिरतेच्या वातावरणामुळे अनेक कर्मचाऱ्यांनी नोकरीचा राजीनामा दिला असून सोसायटीत आतून तणाव वाढला आहे. व्यवस्थापनाकडून बैठकांद्वारे सदस्यांना विश्वास देण्याचे प्रयत्न सुरू असले तरी परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाताना दिसत आहे. प्रकरण सीआयडीकडे गेल्याने आगामी काळात मोठ्या घडामोडी घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## राष्ट्रवादीच्या उमेदवारावर तरुणाने उधळल्या नोटा


### निवडणूक आयोग काय कारवाई करणार?



**■ महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २९ :**
उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवाराच्या अंगावर एका तरुणाने नोटा उधळल्याची घटना नागपूरच्या कामठीत घडली आहे. यासंबंधीचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.
राष्ट्रवादी काँग्रेसचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार शाहजहाँ शफावत अन्सारी हे कामठी नगरपरिषदेच्या निवडणुकीत नगराध्यक्षपदाचे उमेदवार आहेत. त्यांची शुक्रवारी रात्री सभा झाली. या सभेत ते भाषण देत असताना एका तरुणाने अचानक त्यांच्याकडे जात त्यांच्या अंगावर नोटा उधळल्या.
यावेळी या तरुणाने आपल्या मनातील भावनाही व्यक्त केल्या. माझ्या नेत्याला कुठल्या चिन्हाची गरज नाही. हिंदू असो किंवा मुसलमान. सर्वांना जेव्हा गरज भासते तेव्हा तो काँग्रेस भवनात जात नाही, तर शाहजहाँ सेठकडे येतो, असे तो म्हणाला. त्याचे हे बोल ऐकूण शाहजहाँ शफावत अन्सारी यांनी त्याला जवळ घेत त्याला शाब्बासकी दिली.
उल्लेखनीय बाब म्हणजे हा तरुण पैसे उधळत असताना अन्सारी यांनी त्याला रोखण्याचाही प्रयत्न केला नाही. उलट तिथे उपस्थित नागरिकांनी ओरडून एकप्रकारे त्याच्या कृतीचे समर्थनच केले. त्यामुळे आता निवडणूक आयोग या प्रकरणी काय कारवाई करते हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.
कामठीत यंदा चौरंगी लढत
उल्लेखनीय बाब म्हणजे कामठी नगरपालिकेत गत अनेक वर्षांपासून काँग्रेसची सत्ता आहे. पण यावेळी येथे चौरंगी लढत होणार असून, त्याचा फटका काँग्रेसला बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. काँग्रेसने येथील नगराध्यक्षपदासाठी शाकूर नागानी यांना उमेदवारी दिली आहे.
यामुळे माजी नगराध्यक्ष शाहजहाँ अन्सारी यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देत राष्ट्रवादीत प्रवेश केला आहे. दुसरीकडे, गत लोकसभा विधानसभा निवडणुकीत भाजपसोबत असणा ?या बरिएमच्या नेत्या ॲड. सुलेखा कुंभारे यांनी यावेळी भाजपपासून फारकत गेतली आहे. बरिएमचे अजय कदम कामठीत नगराध्यक्षपदाचे उमेदवार आहेत. भाजपसाठी हा धक्का मानला जात आहे.
भाजपने येथे अजय अग्रवाल यांना उमेदवारी दिली आहे. बरिएमचे अजय कदम यांनी आपली उमेदवारी कायम ठेवल्याने काँग्रेस व भाजप या दोघांचीही चिंता वाढली आहे.
त्यांच्या उमेदवारीमुळे अल्पसंख्याक व वंचित मतांमध्ये विभागणी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे संपूर्ण निकालाचे समीकरण बदलू शकते. भाजपलाही या मतांचे महत्त्व असल्याने त्यांचे गणितही यामुळे बिघडण्याची भीती आहे.

## राज्यातील लाडक्या बहिणींवर सरकारकडून घोषणांचा पाऊस

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९ :**
स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे वातावरण तापलेलं असतानाच राज्याच्या राजकारणात एकाएकी घोषणांचा महापूर येऊ लागला आहे. मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या चंद्रपूर दौऱ्यानं तर या वातावरणात आणखी खळबळ उडवली आहे. घुग्घुस नगरपरिषद निवडणुकीच्या प्रचारसभेत त्यांनी असा बॉम्ब टाकला की सभास्थळावर उपस्थित नागरिकांनी कान टवकारले.



बावनकुळे म्हणाले, राज्यातील तुकडेबंदी कायदा आम्ही हटवला आहे... आणि त्या सर्व घरांना प्रॉपर्टी कार्ड देण्याचा निर्णय लवकरच आपल्या सरकारकडून जाहीर होणार आहे.ह्व या एका वाक्यानं नागरिकांच्या अपेक्षा क्षणात वाढून गेल्या. पण खरी धडाकेबाज घोषणा यानंतर करण्यात आली.
लाडक्या बहीण योजनेअंतर्गत राज्यभरातील महिला बचत गटांना तब्बल १ लाखांच्या अनुदानाची घोषणा, शेतकऱ्यांसाठी वीजबिल माफी, आणि सूर्यघर योजनेतून मोफत वीज पुरवठ्याचा संकल्प—या सलग घोषणांनी सभेत टाळ्यांचा कडकडाट झाला. महिलांपासून शेतकऱ्यांपर्यंत सर्वांसाठी गिफ्ट पॅक उघडल्यासारखं वातावरण निर्माण झालं.
यावेळी काँग्रेसवर टीका करत बावनकुळे म्हणाले, काँग्रेस म्हणजे बुडतं जहाज जनता त्यांच्यावर विश्वास ठेवत नाही. यानंतर त्यांनी घुग्घुस नगरपरिषद निवडणुकीतील उमेदवार पूजा ताई दुर्गम यांच्या विजयासाठी मतदारांना थेट आवाहन करून सभा तापवत शेवट गाठला.
निवडणुकीच्या रणांगणात अशा मोठ्या घोषणांचा पाऊस पडत असताना, या वचनांचा किती परिणाम होणार आणि मतदार कोणाकडे झुकणार—याकडे आता सर्वांचं लक्ष लागून राहिलं आहे.




## राज्यात केवळ आधार कार्डावर जारी केलेले जन्म प्रमाणपत्र रद्द होणार

# बनावट प्रमाणपत्र वापर थांबवण्यासाठी सरकारचा निर्णय

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९ :**

उशिरा जन्मदाखला बनवताना केवळ आधार कार्ड हा पुरावा म्हणून ग्राह्य धरला जाणार नाही आणि जन्म-मृत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम, २०२३ लागू झाल्यानंतर केवळ आधार कार्डाच्या आधारावर तयार केलेले सर्व जन्मदाखले रद्द करण्यात येतील, अशी सूचना राज्य महसूल विभागाने जारी केली आहे.

बनावट जन्म आणि मृत्यू दाखल्यांचा वापर थांबवण्यासाठी शासनाने हा निर्णय घेतला आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आधार कार्डाचा वापर करून संशयास्पद रीतीने जारी केलेले सर्व दाखले रद्द करण्याचे आदेश दिले आहेत. आतापर्यंत हे दाखले जारी करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

अमरावती, सिल्लोड, अकोला, छत्रपती संभाजीनगर शहर, लातूर, अंजनगाव सुर्जी, अचलपूर, पुसद, परभणी, बीड, गेवराई, जालना, अधार्पूर आणि परळी यासह मोठ्या संख्येने अनधिकृत जन्म-मृत्यू प्रकरणे आढळलेल्या १४ विभागांना चिन्हित करण्यात आले आहे. संभाजीनगर जिल्ह्यात २,७०० बनावट जन्म प्रमाणपत्रे आढळली होती. तर राज्यभरात एकूण २,२३,००० आढळली होती.

महसूल विभागाने १६ कलमी पडताळणी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. त्यानुसार राज्यात प्रलंबित असलेले अर्ज तातडीने निकाली काढणे आवश्यक असल्याने, सर्व संबंधित कार्यालयांची तपासणी करून सार्वजनिक आरोग्य विभागाने जारी केलेल्या नियमांनुसार कारवाई करावी. तसेच, या एसओपी नुसार नसलेले दाखले त्वरित रद्द करावेत आणि नागरी नोंदणी प्रणाली पोर्टलवरील (सीआरएस) नोंदी तात्काळ हटवाव्यात, असेही मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद करण्यात आले आहे. कोणत्याही विषयासाठी किंवा प्रकरणात आधार कार्ड पुरावा म्हणून स्वीकारले जाऊ शकत नाही आणि प्रलंबित अर्जांची तपासणी करताना आधार क्रमांक आणि जन्म दाखल्यावरील जन्मतारीख यामध्ये कोणताही फरक आढळल्यास, पोलिस तक्रार दाखल करावी, अशाही सूचना दिल्या.

जन्म दाखल्यासाठी केवळ आधार कार्ड हाच मूळ महत्त्वाचा पुरावा मानला गेला असेल, त्यात तफावत असल्यास त्यांची यादी पोलिसांना देण्यात येईल.

## जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर अपघात

# दोन जण जखमी



**■ महासागर प्रतिनिधी, पिंपरी-चिंचवड, दि. २९ :**

जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर सकाळपासून दोन वेगवेगळे अपघात झाले असून देहूरोड आणि कामशेत परिसरात दोन्ही ठिकाणी कार पलटी झाल्याची घटना घडली आहे. देहूरोड परिसरात पहाटे झालेल्या अपघातात दोन जण किरकोळ जखमी झाले आहेत, तर कामशेत येथील घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

पहिल्या अपघातात, जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर मुंबईकडे जाणाऱ्या एका कारने रस्त्याच्या कडेला उभा असलेल्या वाहनाला पाठीमागून जोरदार धडक दिली. भरधाव वेगातील या धडकेमुळे दोन्ही वाहने पलटी झाली. अपघातात जखमी झालेल्या दोघांना तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. दुसऱ्या घटनामध्ये, कामशेतजवळील जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर मुंबईच्या दिशेने भरधाव कारवरील चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे कार पलटी झाली. या अपघातात कुणीही जखमी झाले नाही. अपघातामुळे काही वेळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. ही घटना दुपारी सव्वा बाराच्या सुमारास घडली.

## सरकारचा साधूंच्या नावाखाली संधिसाधूपणा

# राज ठाकरे तपोवनातील वृक्षतोडीवर संतापले

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९ :**



मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी नाशिकच्या तपोवनातील वृक्षतोडीवरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारला चांगलेच फैलावर घेतले आहे. सरकारने साधूंच्या नावाखाली उद्योगपतींच्या घशात काहीतरी टाकण्याचा संधिसाधूपणा करू नये. भाजप सरकारने काही वर्षांपूर्वी काही कोटी झाडे लावल्याची घोषणा केली होती. पण त्यातील एकही झाड कुठे दिसले नाही, असे ते म्हणालेत.

नाशिक येथे 2027 मध्ये कुंभमेळा होत आहे. यासाठी प्रभू श्रीरामांच्या पदस्पर्शाने पवित्र झालेल्या नाशिक लगतच्या तपोवनातील झाडांची कत्तल केली जाणार आहे. विरोधकांनी या मुद्यावरून महायुती सरकारवर टीकेची झोड उठवली आहे. सरकारने एका झाडाच्या बदल्यात 10 झाडे लावण्याची तयारी दर्शवली आहे. पण त्यालाही विरोधकांनी जोरदार विरोध केला आहे. त्यात आता मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भर पडली आहे.

राज यांनी शनिवारी एका पोस्टद्वारे या प्रकरणी सरकारची चांगलीच खरडपट्टी काढली.

राज ठाकरे म्हणाले, आगामी कुंभमेळ्यासाठी सरकारने 1800 झाडं तोडण्याचा निर्णय घेतला आहे. नाशिकमध्ये कुंभमेळा हा काही पहिल्यांदा होत नाहीये. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या महापालिकेच्या सत्ताकाळात पण कुंभमेळा झाला. त्यावेळेला आम्ही भरपूर पायाभूत सुविधा उभारल्या. त्यावेळच्या नगरसेवकांचा आणि प्रशासनाचा उत्तम संवाद होता, त्यामुळे कामं करताना जनतेला काय हवं आहे याचा विचार केला गेला. एकूणच नियोजन इतकं उत्कृष्ट होतं की तेव्हाच्या महापौरांचा,नगरसेवकांचे प्रतिनिधी म्हणून आणि तत्कालीन आयुक्तांचा, प्रशासनाचे प्रतिनिधी म्हणून, थेट अमेरिकेत सत्कार झाला होता. आम्हाला या पायाभूत सुविधा उभ्या करताना कुठली झाडं तोडावी लागली नाहीत. मग आत्ता या कुंभमेळ्यासाठी झाडं का तोडावी लागत आहेत?

# एचएसआरपी नंबर प्लेट बसवण्याची आज शेवटची संधी

**■ महासागर प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर, दि. २९ :**

छत्रपती संभाजीनगरमध्ये हाय सिक्युरिटी नंबर प्लेट (एचएसआरपी) बसवण्यासाठी आतापर्यंत ८ लाख वाहनांपैकी ३ लाख ५४ हजार ७०१ वाहनधारकांनी प्लेटसाठी ऑनलाइन बुकिंग केली आहे. त्यातील २ लाख ९८ हजार ६४१ वाहनधारकांनी नंबर प्लेट बसवली आहे. बुकिंग केलेल्यापैकी ५६ हजार वाहनधारकांना प्लेट बसवण्याचे काम सुरू आहे. नंबर प्लेट बसवण्याची मुदत ३० नोव्हेंबर रोजी संपणार आहे. अद्याप ५ लाख वाहनांना नंबर प्लेट बसवण्याचे आव्हान आहे.

देशभरात एकाच स्वरूपाच्या वाहनांना नंबर प्लेट असाव्यात, यासाठी हा निर्णय घेतला आहे. सर्व प्रकारच्या वाहनांना नवीन सुधारित, अद्ययावत नेमप्लेट बसवावी लागणार आहे. त्यासाठी आरटीओ कार्यालयाने एजन्सी नेमली आहे. हाय सेक्युरिटी नंबर प्लेट बसवण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्यासाठी ३१ मार्च २०२५ ही मुदत दिली होती.

# भरधाव कारला भीषण आग

**■ महासागर प्रतिनिधी पिंपरी-चिंचवड, दि. २९ :**



पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर भरधाव कारने अचानक पेट घेतल्याची घटना दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास अमृतांजन पुलाजवळ घडली. सुदैवाने कारमधील सर्व प्रवासी सुखरूप आहेत.

अचानक कारमधून धूर निघू लागल्याने चालकाने वाहन महामार्गाच्या बाजूला घेऊन थांबवले. स्थितीचा अंदाज घेत प्रवाशांनी तत्काळ कारच्या बाहेर पडत जीव वाचवला. त्यानंतर काही क्षणांतच कारने पूर्णपणे पेट घेतला. काही वाहनचालक मात्र कार जवळून धोकादायक रीतीने प्रवास करत असल्याचे पाहायला मिळाले. घटनेत कार जळून खाक झाली आहे. घटनेची माहिती मिळताच आयआरबीच्या अग्निशमन दलाने तातडीने धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवले. या घटनेमुळे द्रुतगती मार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. घटनास्थळी बोरघाट महामार्ग पोलीस दाखल झाले होते.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या घोषणा म्हणजे अशीही बनवाबनवी



## काँग्रेसचे माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांचे प्रत्युत्तर

**■ महासागर प्रतिनिधी, संगमनेर, दि. २९ :**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रचारादरम्यान वेगवेगळ्या ठिकाणी उद्योगमंत्री उदय सामंत यांना व्यासपीठावरूनच फोन लावत एमआयडीसी मंजूर केल्याची ध्वनीफित ऐकवत, ते जिथे जातात तिथे एमआयडीसी मंजूर करतात. उद्या ते नद्या, डोंगरही मंजूर करतील. कालही संगमनेरमध्ये त्यांनी सगळेच मंजूर करून टाकले. सध्या त्यांची अशी ही बनवाबनवी चालू असल्याची खिल्ली काँग्रेसचे माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांनी उडवली.

संगमनेरच्या प्रचार सभेत बाळासाहेब थोरात बोलत होते. माजी आमदार डॉ सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे, माजी नगराध्यक्ष दुर्गाताई तांबे, दिलीप पुंड, विश्वास मुर्तडक, नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ. मैथिली तांबे यांच्यासह सर्व उमेदवार उपस्थित होते.

निवडणुकीत आश्वासने द्यावी लागतात हे खरे असले तरी फसवी आश्वासन देणे योग्य नाही. पुणे-नाशिक रेल्वेमार्ग संगमनेर मार्गेच जाणार होता तसेच सर्वेक्षण होऊन जमिनीही ताब्यात घेतल्या गेल्या होत्या. मात्र त्यात यांनी खोडा घातला. पुन्हा मूळ मार्गावरून रेल्वेमार्ग जावा यासाठी सत्यजित आणि मी भांडतो आहे. मात्र ज्याने भांडायला हवे, तो मूग गिळून बसल्याचा टोला त्यांनी आमदार अमोल खताळ यांना लगावला.

गेल्या ३० वर्षाच्या कालखंडात नगरपालिका कायम विकासाच्या मार्गावर ठेवली. विरोधी नगरसेवकांनाही सोबत घेत एकमताने सर्व ठराव मंजूर झाले, हा इतिहास आहे. चांगले काम असल्यामुळे तर सत्ता नसतानाही २७ कोटी रुपयांची बक्षिसे नगरपालिकेला मिळाली आहेत. समृद्ध व्यापार, शांतता, सुव्यवस्था बंधुभाव यांनी नटलेले हे शहर आहे. सध्या शांतता बिघडत चालली असून कोणाचा हात तोडला जातोय, पोलीस ठाण्यात मारामाऱ्या होतात, नशेचा व्यापार करणारी यांच्या व्यासपीठावरून भाषणे ठोकतात, हे नेमके कोणत्या दिशेला चालले आहे याचा विचार करायला हवा. शहराला बाधक असलेल्या या प्रवृत्तींपासून लोकांनी सावध राहिले पाहिजे. अन्यथा पुन्हा जुने दिवस येतील, अशा इशारा देतानाच समृद्ध शहरासाठी संगमनेर सेवा समितीच्या उमेदवारांना मतरूपी शाबासकी द्यावी असे आवाहनही त्यांनी केले.

आमदार सत्यजित तांबे म्हणाले की, उपमुख्यमंत्री शिंदे यांनी रेल्वे मार्गासाठी पंतप्रधान मोदी, गृहमंत्री शहा यांना भेटणार असल्याचे आश्वासन दिले. मात्र त्यांनी या दोघांनाही भेटण्याऐवजी आमच्या शेजाऱ्यांना समजून सांगावे, कारण आमची रेल्वे त्यांनीच पळवून शिर्डीमार्गे नेली आहे.

# लग्नाला निघालेले दाम्पत्य गूढपणे बेपत्ता

**■ महासागर प्रतिनिधी, जळगाव, दि. २९ :**



तेलंगणातून जळगावच्या दिशेने निघालेले एक दाम्पत्य अर्ध्या रस्त्यातून गूढपणे बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. या दाम्पत्याचे शेवटचे लोकेशन बुलढाणा जिल्ह्यातील वडनेर गावालगत आढळले. त्यामुळे त्यांचा घातपात झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. पोलिस सध्या या दाम्पत्याचा कसून शोध घेत आहेत.

या प्रकरणी रमेश पाटील यांनी नांदुरा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, त्यांचे चुलतबंधू पद्मसिंह दामू पाटील हे तेलंगणात त्यांची पत्नी नम्रता व मुलीसह राहतात. ते तेलंगणा राज्यातील सीतापुरम येथील एका खासगी सिमेंट कंपनीत नोकरीस आहेत. 27 नोव्हेंबर रोजीस काळी 6 च्या सुमारास पद्मसिंह आपली पत्नी व मुलीसह घरच्या लग्नासाठी जळगावला येण्यासाठी निघाले. ते त्यांच्या कारने गावी येत होते. सकाळी घरून निघाल्यानंतर त्यांचे त्यांच्या भावाशी बोलणे झाले. त्यानंतर रात्री 10 वाजेपर्यंत ते घरी पोहोचणे अपेक्षित होते.

पण रात्रीचे 10 वाजले तरी ते घरी पोहोचले नाही. आणखी काही वेळ वाट पाहून रमेश यांनी पद्मसिंह यांना फोन करण्याचा प्रयत्न केला. पण त्यांचा मोबाईल बंद येत होता. त्यानंतर त्यांनी त्यांची वहिणी तथा पद्मसिंह यांची पत्नी नम्रता यांना फोन केला. त्यांचाही फोन बंद येत होता. त्यानंतर कालपर्यंत म्हणजे 28 नोव्हेंबरपर्यंत नातेवाईकांनी त्यांचा फोन ट्राय केला. त्यांचा शोध घेतला. पण ते सापडले नाही. अखेर त्यांनी पोलिसांकडे धाव घेऊन ते बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी त्यांचा शोध सुरू केला. त्यात बेपत्ता दाम्पत्याचे शेवटचे लोकेशन बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव ते मलकापूर दरम्यान महामार्गावर असणाऱ्या वडनेर गावालगत आढळले.

वडनेर भोलजी येथूनच त्यांचा संपर्क तुटला. त्यामुळे आता पोलिस वडनेर परिसरात या दाम्पत्याचा शोध घेत आहेत. त्यांनी या दाम्पत्याचा घातपात झाल्याचाही संशय व्यक्त केला आहे.

# कुंभमेळ्याच्या नावाने जमीन लाटण्याचा सत्ताधाऱ्यांचा डाव : रोहित पवार

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९ :**



भ्रष्टाचार हीच भक्ती आणि सत्ता हीच श्रद्धा असणाऱ्या सत्ताधाऱ्यांना तपोवनाचं महत्व काय कळणार? नगरपालिका बिनविरोध केली म्हणजे प्रॉफिट कमवण्यासाठी त्याच पद्धतीने तपोवन खाली करता येईल हा कोणाचा समज असेल तर हा तथाकथित संकटमोचकांचा गोड गैरसमज आहे, असे म्हणत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी भाजपचे मंत्री गिरीश महाजन यांच्यावर निशाणा साधला आहे.

तपोवनात साधूग्रामसाठी 1800 वृक्षतोडीची तयारी महापालिकेने केल्याने पर्यावरणप्रेमी, वृक्षप्रेमींनी आंदोलन उभे केले आहे. यावर मात्र शुक्रवारी (दि. 28) महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांनी येथील एकही झाड तोडले जाणार नसून केवळ 5 ते 7 वर्षांत वाढलेली झुडपे काढली जाणार असल्याचे विधान करतानाच काही लोक दिशाभूल करत असल्याचेही व्यक्त केले. यावरुन रोहित पवारांनी टीका करत मंत्री गिरीश महाजन यांना टार्गेट केले आहे.

कुंभमेळ्याच्या नावाखाली जमीन मोकळी करायची आणि कुंभमेळा संपताच एखाद्या संस्थेच्या नावाने जमीन लीजवर घेऊन लाटायची हाच सत्ताधाऱ्यांचा खरा डाव असून तपोवनाची जमीन लाटण्यासाठीच एवढा अट्टहास सुरु आहे.

## महाराष्ट्रात तापमानात घट

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९ :**

उत्तर भारतातून पुन्हा थंड वारे वाहण्यास सुरुवात झाल्याने महाराष्ट्रात तापमानात घट होण्याची शक्यता आहे. हवामान शास्त्रज्ञांच्या अंदाजानुसार, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि उत्तर कोकणातील शहरांमध्ये शनिवारीपासून किमान तापमानात घट जाणवेल.मराठवाड्यातही तापमान १० अंश सेल्सिअसपर्यंत खाली येण्याची शक्यता आहे, तर उत्तर कोकणातील शहरांमध्ये सकाळी पारा खाली येईल.मुंबईत री किमान तापमान २० अंश सेल्सिअस नोंदविण्यात आले होते.

# प्रेयसीने प्रियकराच्या मृतदेहाला लावली हळद आणि केले लग्न

**■ महासागर प्रतिनिधी, नांदेड, दि. २९ :**

**सक्षम ताटे खून प्रकरणाने नांदेड हादरले**



नांदेड शहरातील जुना गंज परिसरात खून प्रकरणाने खळबळ उडाली आहे. सक्षम ताटे नावाचा तरुणाला त्याची प्रेयसी आंचल मामीलवाडच्या वडिलांनी आणि भावाने निर्घृणपणे ठार केले. सक्षमवर गोळ्या झाडल्या गेल्या, त्यानंतर डोक्यावर फरशी घालून त्याची हत्या करण्यात आली. या प्रकरणामुळे परिसरातील नागरिकांमध्ये संताप आणि भयाची परिस्थिती निर्माण झाली.

दरम्यान त्याच्या अंत्यविधाला भावनिक घटना घडली. मृतदेहावर प्रेयसी आंचल मामीलवाडने काही विधी केले. ती सक्षमच्या अंत्यसंस्कारासाठी त्याच्या घरी गेली आणि मृतदेहासमोर लग्नाचे विधी पार पडल्या. उपस्थितांच्या डोळ्यांसमोर तिने त्याच्या अंगावर हळद लावली, आपल्या कपाळावर कुंकू भरले आणि ढसाढसा रडली. घटनाक्रमानुसार,सक्षम ताटे याला मुलीच्या वडिलांना बोलावून घेतले होता. त्याठिकाणी गजानन मामीलवाड, साहिल मामीलवाड आणि इतर तिघांनी त्याच्यावर मारहाण करून हत्या केली. पोलिसांनी या प्रकरणी आंचलच्या वडील गजानन मामीलवाडसह पाच जणांना अटक केली आहे. आरोपींमध्ये जयश्री मदनसिंह ठाकूर, गजानन बालाजीराव मामीलवाड, साहील ठाकूर, सोमाश लखे आणि वेदांत यांचा समावेश आहे.

दरम्यान सक्षम आणि आंचल यांचे तीन वर्षांपासून प्रेमसंबंध होते, पण जातीच्या भेदामुळे आंचलच्या कुटुंबीयांनी या नात्याला विरोध दर्शवला. आंचलने पोलिसांना सांगितले की, सक्षम जेलमधून सुटल्यावरही आमच्या कुटुंबीयांनी त्याचा खून करण्याचा कट रचला.

आमच्या प्रेमाला विरोध असल्यामुळे त्यांनी सक्षमला ठार केले, परंतु माझा प्रियकर मृत्यूनेही जिंकला. माझ्या वडिलांना आणि भावाला फाशीची शिक्षा मिळावी, असे तिने मागणी केली आहे.

## सराईत आरोपीकडून पिस्तूल जप्त

**■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २९ :**

देशी बनावटीचे पिस्तूल बाळगणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला पुणे गुन्हे शाखेच्या युनिट तीनने अटक केली आहे. दांडेकर पूल परिसरात ही कारवाई करण्यात आली असून, आरोपीकडून पिस्तूल आणि दोन काडतुसे जप्त करण्यात आली आहेत. नरेंद्र महादेव बलकवडे (वय ३५, रा. मेहेंदळे गॅरेजजवळ, एरंडवणे, पुणे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. बलकवडे हा सराईत गुन्हेगार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# सांगलीत १०१ कर्मचाऱ्यांचे रक्तदान



**■ महासागर प्रतिनिधी, सांगली, दि. २९ :**

जिल्ह्यामध्ये रक्ताचा तुटवडा भासू नये. मागेल तेव्हा रक्त उपलब्ध राहील, अपघातामधील रूग्ण, मोठ्या शस्त्रक्रियावेळी रूग्णांना तातडीने रक्त उपलब्ध होईल यासाठी आपण सर्वजण प्रयत्न करूया. सामाजिक योगदानासाठी रक्तदान चळवळ सांगली प्रारूप म्हणून विकसीत करू, असे आवाहन जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात इंडियन रेडक्रॉस सोसायटी डॉ. शिरगावकर रक्त संकलन केंद्र यांच्यावतीने आयोजित रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. स्नेहल कनिचे, तहसिलदार लीना खरात, तहसिलदार (महसूल) जितेंद्र मोरे, इंडियन रेडक्रॉस सोसायटी डॉ. शिरगावकर रक्त संकलन केंद्राचे अध्यक्ष डॉ. शिरीष काळे, उपाध्यक्ष डॉ. श्रीनिवास नाटेकर, विनय भट तसेच पदाधिकारी व स्टाफ, जिल्हाधिकारी कार्यालय व मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना जिल्हाधिकारी श्री. काकडे म्हणाले, नियमितपणे रक्तदान झालं पाहिजे, यासाठी ब्लड बँक रेड क्रॉस सोसायटीनेही वेगवेगळ्या कार्यालयांमध्ये जाऊन रक्तदानासाठी आवाहन करावे. जगामध्ये सगळ्या गोष्टी तयार करता येतात. परंतु मानवी पेशींना किंवा मानवाला स्वत च्या शरीरासाठी जे निसगार्तून किंवा आईच्या पोटातून मिळालेले आहे, ते निर्माण करणारी एकही वस्तू अद्यापपर्यंत आपण तयार करू शकलो नाही. त्यात रक्त हा असाच एक महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे जर आठवड्याला ठराविक बाटल्या आपल्या रक्तपेढीला देता आल्या तर वर्षभर रूग्णांसाठीची रक्ताची गरज आहे ती व्यवस्थितपणे पूर्ण होईल, असे ते म्हणाले.

# यंदा प्रचारात सोशल मीडियाचा मोठया प्रमाणात होणार वापर

**■ दीपक मोहिते, पालघर, दि. २९ :**



ग्रामीण भागात नगरपरिषदा व नगरपंचायतीच्या निवडणुकांचा प्रचार धूमधडाक्यात सुरु असून निवडणुकीच्या रिंगणातील उमेदवारांनी यावेळी प्रचारात प्रसिद्धी करण्यासंदर्भात वारेमाप खर्च करण्याचे टाळले आहे. त्यांच्या आयटी टीमने प्रचारासाठी सोशल मीडियाचा चांगला आधार घेतला आहे. तर अनेक उमेदवार फेसबुक, व्हाट्सअप, इंस्टाग्राम, इ.चा बेमालूम वापर करत आहेत. या माध्यमातून उमेदवार स्वतः थेट मतदारांशी संवाद साधत आहेत. त्यामुळे पैसा व वेळेची चांगलीच बचत होत आहे.प्रचार संपण्यास आता अवघे ४८ तास उरले आहेत.या निवडणुकीनंतर जिल्हा परिषद,पंचायत समित्या व त्यानंतर महानगरपालिका निवडणुकीचे बिगुल वाजणार आहे. या सर्व निवडणुकीत उमेदवाराच्या प्रचाराचा फोकस " परिसर विकास व सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन समस्या व प्रश्न," यावर राहणार आहे. या निवडणुकीतही सोशल मीडियाचा मोठ्याप्रमाणात वापर होणार आहे.

या सर्व धामधूमीत सर्वसामान्य करदाते देखील आपले हक्क व अधिकार अबाधित राहावेत, यासाठी उमेदवाराकडून अपेक्षा व्यक्त करू पाहताहेत. त्यासाठी त्यांनी नागरिकांची हक्काची सनद तयार केली आहे.ती खालीलप्रमाणे आहे. शहरातील जिल्हा परिषदेच्या शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्रे व रुग्णालये महानगरपालिकेकडे कधी हस्तांतरीत होणार? हस्तातरण प्रक्रियेत कोणत्या अडचणी आहेत. महानगरपालिका क्षेत्रातील अंतर्गत रस्त्याची डागडुजी, दुरुस्ती किंवा पुनर्बांधणीचा मुहूर्त कधी? वषार्नुवर्षे अशीच लूट होत राहणार का ? शहरातील करदात्यांना दर्जेदार आरोग्य व वैद्यकीय सेवा कधी उपलब्ध होणार?" आपला दवाखाना," योजनेची सद्यस्थिती पाहता,ही व्यवस्था फार काळ चालणार नाही,असे करदात्यांना वाटते? त्यामध्ये किती तथ्य आहे? शहरातील पाच उड्डाणपूल व रिंगरुट रखडण्यामागची नक्की कारणे काय होती ? महाराष्ट्र प्रदेश विकास प्राधिकरणाने त्यासाठी आर्थिक तरतूद करण्याचे मान्य केले होते,पण त्यासंदर्भात आवश्यक असलेला प्रस्ताव का पाठवला गेला नाही. लघुपाटबंधारे विभागाच्या पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यासाठी महानगरपालिकेने काही वर्षांपूर्वी आपल्या अर्थसंकल्पात तरतूद केली होती, पण योजना तसूभरही पुढे सरकल्या नाहीत,यामागची नेमकी कारणे काय आहेत? व त्या निधीचे पुढे काय झाले?" भूमिगत वीजवाहिन्या, " या कळीच्या मुद्द्याचे काय झाले ? मतदारांना फसवण्याचे पाप नेमके कोणी केले? अंतर्गत रस्ते वारंवार का फुटतात? डांबर चोरणारे कोण? त्यांना कोणाचे संरक्षण आहे? नालेसफाई न करता ठेकेदार आपली बिले कशी काढतात? अशी बिले काढणाऱ्या अलीबाबा आणि ४० चोरांच्या टोळीत कोणकोण आहेत. सध्या अलीबाबा इडीच्या कोठडीतून बाहेर आला आहे. इतर ४० चोर कधी आत जाणार? बाजार कर व कचरा उचलणे, रस्त्याचे खड्डे बुजवणे व पॅचवर्कचे टेंडर्स कोणाला दिली जातात व करदात्याच्या दरवर्षी किती पैश्याची उधळपट्टी होत असते. बेनामी नावाने ठेके घेणारे कोण आहेत? हे आम्हा करदात्यांना कळले पाहिजे,कारण तो आमचा अधिकार आहे. यासर्व प्रश्नांची उत्तरे या भावी नगरसेवकानी दिली पाहिजेत.

# 9 लाख चौरस फूट जागेवर आधुनिक शहराची उभारणी

## ‘नवीन अमरावती’ एकीकृत विकास योजनेकडे ऐतिहासिक पाऊल

### अमरावतीच्या रूपांतरणाची सुरुवात!

### खासदार डॉ. अनिल बोंडे यांचा पुढाकार



### मॉडेल स्टेशन, बिझनेस पार्क, आंतरराष्ट्रीय स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स

जुना धोकादायक पूल हटवून सरळ, रुंद व आधुनिक रस्त्याचे बांधकाम. रेल्वे स्टेशनचे आधुनिकीकरण, नवीन प्लॅटफॉर्म व ‘नेक्स्ट जनरेशन’ मॉडेल स्टेशन. रेल्वे परिसरातील 7.5 लाख व नेहरू मैदानातील 1.5 लाख, अशा एकूण 9 लाख चौरस फूट जागेचा पुनर्विकास. अत्याधुनिक बिझनेस पार्क, मल्टिलेव्हल पार्किंग, विज्ञान संग्रहालय, केंद्रीय वाचनालय, पर्यटन उद्यान, सांस्कृतिक केंद्र आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचा स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स. शहराच्या चारही दिशांना मजबूत कनेक्टिव्हिटी. हा प्रकल्प पीपीपी मॉडेलवर आर्थिकदृष्ट्या सक्षमपणे राबवला जाऊ शकतो.

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 29)** – शहराच्या मध्यभागी असलेला सुमारे 60 वर्षे जुना रेल्वे पूल अत्यंत जीर्ण झाल्याने सुरक्षेच्या कारणास्तव बंद करण्यात आला आहे. या निर्णयामुळे शहरातील वाहतूककोंडी वाढली असून विद्यार्थी, व्यापारी वर्ग आणि सर्वसामान्य नागरिकांना प्रचंड अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर अमरावतीचा दीर्घकालीन व एकात्मिक विकास साधण्यासाठी राज्यसभा सदस्य डॉ. अनिल बोंडे यांच्या पुढाकाराने ‘नवीन अमरावती’ही महत्त्वाकांक्षी एकीकृत विकास योजना रेल्वे मंत्रालयाकडे सादर केली जाणार असल्याची माहिती त्यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत दिली.


या प्रकल्पाबाबत डॉ. बोंडे यांनी केंद्र व राज्यातील प्रमुख नेत्यांशी चर्चा केली असून सर्वांनी तत्त्वत: मान्यता दर्शवून सहकार्याचे आश्वासन दिले आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तसेच पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अमरावतीतील सध्याच्या समस्यांची गांभीर्याने दखल घेऊन या योजनेची तातडीची गरज स्पष्ट केली आहे. लवकरच केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासोबत अंतिम चर्चा होऊन प्रकल्पाची प्रक्रिया वेगाने पुढे जाणार आहे.

‘नवीन अमरावती’ ही केवळ नवीन पूल उभारणीची योजना नसून, आगामी अनेक दशकांसाठी अमरावतीच्या सर्वांगीण विकासाचा पाया मजबूत करणारी भव्य सुरुवात आहे. शहर आता बदलाच्या निर्णायक टप्प्यावर उभे असून या योजनेमुळे आधुनिक, सुरक्षित आणि भविष्याभिमुख अमरावती घडण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

# अमरावतीत दिल्लीसारखा बॉम्बस्फोट करण्याची धमकी

## निनावी कॉलने शहरात खळबळ | आरोपीला फ्रेजरपुरा पोलिसांनी केली अटक | रात्रभर वाहनांची कसून तपासणी





महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 29)** – अमरावतीत दिल्लीसारखा बॉम्बस्फोट करण्याची धमकी देणारा निनावी फोन कॉल आल्यानंतर शहर पोलिस प्रशासनासह सर्व सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या. या कॉलनंतर संपूर्ण शहरात तात्काळ उच्च सतर्कता जारी करण्यात आली.

> धमकीचा कॉल करणारा संशयित इंदौरचा असल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. त्याला ताब्यात घेण्यासाठी आमचे पथक इंदौर रवाना झाले होते. रात्री उशिरा आरोपीला अटक करण्यात आली.
>
> **रोशन शिरसाट, पोलिस निरीक्षक, फ्रेजरपुरा**

शुक्रवारी रात्रभर पोलिसांनी नाकाबंदी, गस्त आणि संशयित ठिकाणांची कसून तपासणी करत सुरक्षा व्यवस्था अधिक कडक केली.

दिल्लीतील स्फोटाच्या पार्श्वभूमीवर देशभरातील सुरक्षा यंत्रणांना आधीच सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. त्यातच शुक्रवारी सायंकाळी शहर पोलिस नियंत्रण कक्षाला आलेल्या फोन कॉलमध्ये अमरावतीत स्फोट घडविण्याची धमकी देण्यात आली. तांत्रिक तपासात हा कॉल इंदौरहून झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर शहर पोलिसांनी तातडीने इंदौर पोलिसांशी संपर्क साधून संयुक्त तपासाला सुरुवात केली.

### पोलिस पथक इंदौर रवाना

शहरातून एक विशेष पथक आरोपीचा शोध घेण्यासाठी इंदौरकडे रवाना झाले. दोन्ही शहरांच्या पोलिसांनी संयुक्तरीत्या तपास सुरू केला होता. अमरावती ते इंदौर हा सुमारे 12 तासांचा प्रवास असल्याने पथक रात्री उशिरा इंदौरमध्ये पोहोचून आरोपीला ताब्यात घेतले.

### फ्रेजरपुरा ठाण्यात गुन्हा दाखल

फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिल्लीतील प्रकरण ताजे असल्याने आरोपीने ही धमकी कोणत्या हेतूने दिली, त्यामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा पोलिसांकडून तपास सुरू आहे.

### कस्तुरा मोगऱ्यात युवकावर प्राणघातक हल्ला

**अमरावती** – बडनेरा पोलीस स्टेशन हद्दीत पुन्हा एकदा गुन्हेगारीचा तांडव पाहायला मिळाला. कस्तुरा मोगरा गावातील स्वप्निल श्रीराम पवार (वय 30) या युवकावर जुन्या वैमनस्यातून प्राणघातक हल्ला करण्यात आला. ही घटना 28 नोव्हेंबर रोजी सायंकाळी सातच्या सुमारास घडली. स्वप्निल पवार गावातील चौकात उभा असताना आरोपी सोनू विष्णू राठोड (वय 30) याने अचानक चाकूने वार केले. या हल्ल्यात स्वप्निलच्या मानेवर, कंबरेवर आणि पोटावर खोल जखमा झाल्या. गंभीर जखमी अवस्थेत त्याला आई व बहिणीने जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले असून त्याची प्रकृती चिंताजनक आहे. हल्ल्यानंतर आरोपी फरार झाला असून बडनेरा पोलिसांनी गुन्हा नोंदवून शोध मोहीम सुरू केली आहे. तीन वर्षांपूर्वीच्या किरकोळ वादातून हा हल्ला झाल्याचे प्राथमिक चौकशीत समोर आले आहे. अलिकडेच ऋषी खापेकर हत्याकांडानंतर दोन दिवसांत दुसरा गंभीर गुन्हा घडल्याने बडनेरा पोलीस कार्यप्रणालीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# अकोट नगरपरिषदेच्या उमेदवाराचा भीषण अपघातात मृत्यू

## पती व मुले गंभीर जखमी; अचलपूर येथील रुग्णालयात उपचार सुरू

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 29)** – अकोट नगरपरिषद प्रभाग क्रमांक 4 मधून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्या अधिकृत उमेदवार असलेल्या अलमास परवीन शेख सलीम यांचा चांदूर बाजार–परतवाडा मार्गावर झालेल्या भीषण अपघातात मृत्यू झाला. त्यांच्या पतीसह मुलांना गंभीर दुखापत झाली असून त्यांना अचलपूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



माहितीनुसार, शनिवारी दुपारी अलमास परवीन आपल्या पती व मुलांसह दुचाकी (एमएच 27 बीके 4920) ने मायके चांदूर बाजारकडे जात होत्या. चांदूर बाजार–परतवाडा चौफुलीवरील महालक्ष्मी इंडस्ट्रीजजवळ पोहोचताच, मागून येणाऱ्या एका चारचाकी वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की अलमास परवीन यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांच्या पती व मुलांना गंभीर जखमा झाल्याने तातडीने अचलपूर रुग्णालयात हलवण्यात आले. अपघाताची माहिती मिळताच परतवाडा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला आणि मृतदेह पोस्टमार्टेमसाठी पाठवला. अकस्मात झालेल्या या दुर्दैवी घटनेने अकोट, परतवाडा तसेच चांदूर बाजार येथील त्यांच्या मायके गावात शोककळा पसरली आहे. अपघातानंतर अकोटमधील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांनी सर्व प्रचार सभा व रॅल्या तात्काळ रद्द केल्याचे कळते. शनिवार दुपारी त्या सिंदी-बु. (ता. चांदूर बाजार) येथे आपल्या मायकेकडे जात असतानाच हा अपघात झाला.

# लग्नाच्या गाडीतून महिलेची पर्स गायब

## सोन्याचे मंगळसूत्र व दोन मोबाईलसह 5.25 लाखांचा ऐवज चोरी

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 29)** – बडनेरा पोलिस ठाणे हद्दीत लग्नसमारंभाला आलेल्या महिलेची पर्स गाडीतून चोरीला जाण्याची धक्कादायक घटना घडली. पर्समध्ये ठेवलेले सोन्याचे मंगळसूत्र आणि दोन मोबाईल फोन असा तब्बल 5.25 लाखांचा मुद्देमाल अज्ञाताने लंपास केला असून, पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

बडनेरा पोलीस स्टेशन परिसरात एका अज्ञात संशयिताने लग्नाच्या गाडीतून महिलेची पर्स चोरल्याची घटना समोर आली आहे. तक्रारदार महिलेच्या ओळखीच्या व्यक्तीचे साई नगर येथील सद्गुरु धाम येथे विवाह सोहळा होता. दिनांक 28 नोव्हेंबर रोजी ही महिला समारंभाला उपस्थित होती. कार्यक्रमानंतर ती क्रमांक एमएच 27/बीव्ही 3376 असलेल्या लग्नाच्या गाडीतून लग्नस्थळी गेली.

परत आल्यानंतर तिला पर्स गाडीतच राहिल्याचे लक्षात आले. तिने तत्काळ लग्न कार्यालयात जाऊन ड्रायव्हरला पर्सबाबत विचारणा केली. मात्र, ड्रायव्हरने कोणतीही माहिती नसल्याचे सांगितले. पर्समध्ये तब्बल 5 लाख रुपये किंमतीचे 43 ग्रॅम सोन्याचे मंगळसूत्र, 15 हजार रुपये किंमतीचा एक मोबाईल आणि 10 हजार रुपये किंमतीचा दुसरा मोबाईल असा एकूण 5.25 लाखांचा ऐवज होता. महिलेच्या तक्रारीवरून बडनेरा पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून अधिक तपास सुरू केला आहे.

# शेतकऱ्याच्या मृत्यूनंतर जिल्हा रुग्णालयात तणाव

## उपचारातील निष्काळजीपणाच्या आरोप | पोलिसांत तक्रार

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि.29)** – तिवसा तालुक्यातील आनंदवाडी येथील शेतकरी विनोद दिवाकर काळे (42) यांचा रविवारी उशिरा रात्री जिल्हा सामान्य रुग्णालयात मृत्यू झाल्यानंतर आयसीयू विभागासमोर मोठा गोंधळ उडाला. उपचारात गंभीर निष्काळजीपणा झाल्याचा आरोप करत नातेवाईकांनी तीव्र संताप व्यक्त केला. वातावरण तणावपूर्ण झाल्याने सिटी कोतवाली पोलिसांनी तत्काळ बंदोबस्त तैनात केला. दुपारी काळे यांनी शेतात विषारी औषध सेवन केल्याची घटना समोर आली. नापिकी, वाढता ताण आणि कर्जामुळे त्यांनी हे पाऊल उचलल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. तिवसा उपजिल्हा रुग्णालयातून त्यांना अमरावती येथे हलवण्यात आले. रात्री 10.30 वाजता त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर नातेवाईकांनी डॉक्टर व नर्सेसवर रुग्णाला झोपेची चार इंजेक्शने देण्यात आली असा आरोप करत निष्काळजीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. आयसीयू इंचार्ज डॉ. मोरे आजारी असल्याने उपस्थित राहू शकले नाहीत, तर डॉ. सोळंके यांनी उपचार नोंदी तपासून आवश्यक औषधोपचार झाल्याचे सांगितले. मात्र नातेवाईक संतापलेलेच राहिले. शिवसेना रुग्णसेविका सोनल देशमुख यांनीही चौकशीची मागणी केली.

### एनडीपीएस प्रकरणातील आरोपी सहजाद खान फरार

**अमरावती** – 2006 मधील एनडीपीएस प्रकरणातील आरोपी सहजाद खान (वय 41, रा. भातकुली) अनेक वर्षांपासून न्यायालयात गैरहजर असून, तो अद्यापही फरार आहे. त्याच्याविरोधात 25 जून 2014 रोजी गैरसमंती वॉरंट जारी झाले होते. मुलुगु पोलिसांनी नागरिकांना त्याच्या हालचालींबाबत माहिती देण्याचे आवाहन केले आहे.

माहितीनुसार, 2006 मध्ये मल्लमपल्ली बसस्टँड परिसरात खान संशयास्पद अवस्थेत आढळला होता. तपासात पोलिसांनी त्याच्याकडून तब्बल चार किलो सुका गांजा जप्त केला. तो मल्लपल्लीमध्ये तीन हजार रुपयांना खरेदी करून अमरावतीत पाच हजार रुपये प्रति किलो दराने विक्री करत असल्याचे समोर आले होते. गुन्हा क्रमांक 66/2006 अंतर्गत एनडीपीएस कायद्यानुसार त्याच्यावर कारवाई झाली होती. जामीनावर सुटल्यानंतर खान न्यायालयात पुन्हा हजर झाला नाही. त्यामुळे न्यायालयाने आता कडक कारवाई सुरू केली आहे. 15 डिसेंबर 2025 रोजी सकाळी 10.30 वाजता त्याने मुलुगु न्यायालयात हजर राहणे बंधनकारक असल्याचे सर्कल इन्स्पेक्टर सुरेश यांनी सांगितले. कोणतीही माहिती असल्यास 8712670082 या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# प्रचार जेवढा जोमाने करता, तेवढ्याच जोमाने समस्या सोडवीत नाहीत?

**मतदारांचा सवाल**

महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी, (दि.29)**– नगर परिषदेच्या निवडणुकीचे वारे मोर्शीत वादळाप्रमाणे वाहत असून नगरसेवक आणि नगराध्यक्ष पदाकरिता उभे असलेले उमेदवार खूप मोठ्या मनुष्यबळाचा वापर करीत आहेत. या मनुष्यबळाचा वापर रॅली काढणे, चौका चौकात सभा घेणे याकरिता करण्यात येतो. एवढ्या मनुष्यबळाचा वापर यापूर्वीच लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी केला असता तर आज एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रचाराची गरज भासली नसती.

मोर्शी नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदासाठी उभ्या असलेल्या उमेदवारांनी खूप मोठ्या प्रमाणात प्रचार सुरू केला आहे. भाजपा उमेदवारांचे प्रचारासाठी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे काल येऊन गेले त्यांचे प्रचार सभा सोशल क्लब मैदानावर पार पडली. आज काँग्रेस उमेदवारांचे प्रचारासाठी काँग्रेस राष्ट्रवादीचे नेते प्रचारासाठी येत आहेत. निवडून येण्यासाठी सर्व उमेदवार जीवाचा आटापिटा करत आहेत. एवढा आटापिटा यापूर्वीच जर जन समस्या सोडविण्यासाठी केला असता तर हेच उमेदवार जनतेच्या गळ्यातील ताईत ठरले असते. मोर्शी शहरात स्वच्छतेचा बोजवारा उडला आहे. रस्त्यांची बकाल अवस्था झालेली आहे. कुठे कुठे पथदिवे अनेक महिन्यापासून बंद आहेत. हे सर्व पाहण्यासाठी जर उमेदवारांनी यापूर्वीच एवढा मोठा मनुष्यबळाचा वापर केला असता तर खूप बरे झाले असते. आता मतदारांचे पाय धरण्याची वेळ आली नसती. जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांनी रॅली काढायला हवी होती. चौका चौकात जाऊन लोकांच्या समस्या जाणून घ्यायला हव्या होत्या. जनतेचा पैसा, शासनाचा पैसा कुठे कुठे उधळल्या जातो यावर अंकुश ठेवण्याची जबाबदारी जन प्रतिनिधीची आहे. याचा मात्र आतापर्यंत सर्व उमेदवारांना विसर पडलेला होता. काही उमेदवारांनी जनतेची कामे केली परंतु निवडणुकीचा उत्सव जसा पार पडतो तसाच जन समस्या सोडविण्याचा उत्सव तेवढ्यात उत्साहाने पार पडावयास हवा होता असे मतदारांमध्ये बोलल्या जाते.

# लग्नात पाहुण्यांपेक्षा कार्यकर्त्यांचीच गर्दी!

### विवाह सोहळ्यांनाही चढला निवडणुकीचा रंग

**उत्तम ब्राम्हणवाडे**

**नांदगाव खंडेश्वर, (दि.29)**– नांदगाव खंडेश्वर शहरात दिवाळी आणि कार्तिकी एकादशीनंतर लगीनसराईला उधाण आले असताना, विवाहसोहळ्यांत पाहुण्यांपेक्षा निवडणूक कार्यकर्त्यांचीच गर्दी वाढल्याचे चित्र ठळकपणे दिसत आहे. तुळशी विवाहानंतर सुरू झालेल्या लग्नसराईमुळे मंगल कार्यालय मालक, पौरोहित्य करणारे, पारंपरिक वाद्यवृंद, केटरिंग व्यावसायिक आणि घोडे, बिछायत मालकांची जोरदार चलती सुरू आहे. व्यवसाय तेजीत असला तरी या लग्नांमध्ये खऱ्या अर्थाने वऱ्हाड दिसत नाही; त्याऐवजी विविध पक्षांचे कार्यकर्ते आणि इच्छुकांची रेलचेल सुरू आहे.



सध्या उपलब्ध तारखा मिळवणं अवघड झालं आहे. अनेक ठिकाणी मंगल कार्यालये फुल्ल बुक असून, त्यांच्या रिकाम्या तारखांनुसारच ठरविण्याची वेळ नववधू-वर पक्षांवर येत आहे. त्यातच नगर पंचायतीच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू असून, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीची शक्यता वाढली आहे. त्यामुळे जनसंपर्क वाढविण्यासाठी माजी नगरसेवक, माजी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, तसेच स्वयंघोषित पुढारी विवाहसोहळ्यांत ठाण मांडून बसताना दिसत आहेत. यामुळे माईक हातात घेऊन स्वागत करणाऱ्यांची मात्र दमछाक होत आहे. कोणाचे नाव वगळले जाऊ नये म्हणून ते अक्षरश: लिस्ट हातात घेऊनच पाहुण्यांचे स्वागत करत आहेत. वधू-वरांना आशीर्वाद देणाऱ्यांची रांगही प्रचंड वाढत आहे. काहीजण स्टेजवर येताच दोन्ही कुटुंबांचा इतिहास सांगू लागतात, जवळीक सांगतात, संबंध नसतानाही ओळख मिरवतात. काही जण तर नवरा-नवरींना भावी आयुष्यासाठी सल्ले देण्यात गर्क होतात. त्यामुळे लग्नाची मुख्य वेळ पुढे ढकलली जात असून, खऱ्या मांडवातील विधींची गती मंदावते.

### लवकर निघणाऱ्यांची घाई; यजमानांची पंचाईत

काही पाहुण्यांना एका दिवसात अनेक लग्नांचे निमंत्रण असल्यामुळे ते सकाळपासूनच मंगल कार्यालयात हजेरी लावून निघून जातात. लग्नसोहळा सुरू झाला की, दोन मिनिटांत नमस्कार करून बाहेर पडतात. अशा प्रकारामुळे नवरा-नवरींपासून मामापर्यंत सगळ्यांनाच ताटकळावे लागते. निवडणुकीच्या धामधुमीत लग्नसोहळेही राजकीय रंग घेत असल्याचे विश्लेषकांकडून सांगितले जात असून, पाहुण्यांपेक्षा कार्यकर्त्यांची अधिक उपस्थिती ही नांदगाव खंडेश्वर शहरामध्ये सध्या चर्चेची मुख्य बाब बनली आहे.

# अकोल्याच्या डॉक्टरकडून 2.25 लाखांची फसवणूक

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 29)** चेहऱ्यावरील पिंपल्स बरे करण्याच्या नावाखाली अकोल्यातील एका डॉक्टरने अमरावतीतील नागरिकाला तब्बल 2 लाख 25 हजारांनी लुबाडल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी पीडित अनंतकुमार गंगाराम निचत (52, स्वागतम कॉलनी, गोपाल नगर) यांच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी डॉ.डॉ. जरिवाला (अकोला) आणि एका अनोळखी व्यक्तीविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा नोंदवला आहे. काही दिवसांपूर्वी निचत यांच्या मुलगा हर्षला एक अनोळखी युवक भेटला. त्याने हर्षला सांगितले की, तुझ्या चेहऱ्यावर खूप पिंपल्स आहेतज माझ्या बहिणीलाही होते, एका डॉक्टरने तिचे सर्व पिंपल्स बरे केले. असे सांगत त्याने हर्षला आपला मोबाईल नंबर दिला. हर्षने ही माहिती आपल्या वडिलांना सांगितली. त्यानंतर अनंतकुमार यांनी त्या युवकाला फोन केला. त्या युवकाने पुढे अकोल्यातील डॉ. जरिवाला यांच्याशी त्यांची ओळख करून दिली. 18 नोव्हेंबर 2025 रोजी डॉ. जरिवाला स्वत: निचत यांच्या घरी आले. त्यांनी हर्षच्या पिंपल्सवर खास उपचार करणार असल्याचे सांगितले आणि त्यासाठी 2 लाख 25 हजार रुपये घेतले. मात्र पैसे घेतल्यानंतर डॉक्टरांनी कोणताही उपचार न करता गायब झाले. अनेकदा संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही. प्रथम तक्रार पोलिस उपायुक्तांकडे करण्यात आली होती. तपासानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशावरून राजापेठ पोलिसांनी डॉ. जरिवाला (अकोला) व सहकारी अनोळखी युवक यांच्याविरुद्ध फसवणूक आणि विश्वासघाताचा गुन्हा नोंदवला आहे.

# 1240 लिटर अवैध गावठी दारू पकडली

## मोर्शी ते वरुड मार्गावर मनिमपूर फाट्याजवळ कारवाई | साडेचार लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी, (दि.29)**– आदर्श आचार संहिता दरम्यान राज्य उत्पादन शुल्क विभाग अमरावतीच्या विभागीय भरारी पथकाने वरुड येथील अवैध्य हातभट्टी दारु विक्री वाहतुक करतांना धडक कारवाई केली.



राज्य उत्पादन शुल्क, मुंबई चे आयुक्त डॉ. राजेश देशमुख व सह आयुक्त प्रसाद सुर्वे, यांच्या आदेशानुसार तसेच राज्य उत्पादन शुल्क अमरावती विभागाचे विभागीय आयुक्त डॉ. पराग नवलकर, यांचे मार्गदर्शनाखाली आदर्श आचारसंहिता दरम्यान, राज्य उत्पादन शुल्क अमरावती विभाग अमरावती यांच्या मोहीमे अंतर्गत मोर्शी ते वरुड रोडवरील मनिमपुर फाट्याजवळ मनिमपुर शिवारात ता. वरुड जि. अमरावती येथील दिनांक 27 नोव्हेंबर 2025 रोजी अवैध हातभट्टी गावठी दारु विक्री च्या उद्देशाने वाहतुक करत असतांना चित्तरंजक थरारात धडक कार्यवाही करण्यात आली. सदर कारवाई करताना घटनास्थळी आरोपी नामे जिवन प्रभाकर भंडारे (वय 25, रा. जरुड ता. वरुड, जि.अमरावती) यांच्या ताब्यातुन एकुण 1,240 लिटर गावठी दारु व एक चारचाकी वाहन असा एकुण 4,48,200 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर कार्यवाही राज्य उत्पादन शुल्क, विभागीय भरारी पथक अमरावती विभाग अमरावती चे प्रभारी निरीक्षक एम.पी. चीटमटवार, दुय्यम निरीक्षक एस. ए. वानखडे, दुय्यम निरीक्षक टी. आय. शेख, विभागीय भरारी पथक अमरावती विभाग अमरावती यांच्या नेतृत्वाखाली पथकात जवान बी. डी. थोरात, पी. आर. भारती, एम. आर. म्हैसकर, ए. एम. भगत, व ए. एस. हिवराळे यांनी सहभाग घेतला. सदर कारवाईचा पुढील तपास राज्य उत्पादन शुल्क, विभागीय भरारी पथक अमरावती विभाग अमरावतीचे दुय्यम निरीक्षक टी आय शेख करीत आहेत.

# मार्गशीर्षामुळे घरात आचारसंहिता

## कार्यकर्त्यांचा उमेदवारांच्या पार्टीमध्ये मटनावर ताव




### खा कोणाचेही मटन, पण दाबा आपल्याच उमेदवाराचे बटन!

मार्गशीर्षात घराघरांत उपवासाचे दिवस असल्याने मांसाहार वर्ज्य मानला जातो. परंतु निवडणुकीच्या निमित्ताने अनेकांची मांसाहारी सोय उत्तम झाल्याचे चित्र आहे. त्यामुळे खा कोणाचेही मटन पण दाबा आपल्याच उमेदवाराचे बटन असे आवाहन करण्याची वेळ नेत्यांवर येत आहे. दरम्यान, शाकाहारींसाठी खास वांग्याचे भरीत आणि शेवभाजीचीही व्यवस्था केली जात असून कार्यकर्त्यांचे लाड पुरवताना उमेदवारांसह पक्षांचा खर्च वाढत आहे.

महासागर | प्रतिनिधी

**पथ्रोट, (दि.29)** – जिल्ह्यात नगरपरिषद निवडणुकांचा प्रचार आता शिगेला पोहोचला असून उमेदवारांच्या मागे पायाला भिंगरी लावून फिरणाऱ्या कार्यकर्त्यांची चांगलीच चलती झालेली आहे. मार्गशीर्ष महिन्यामुळे घरी मांसाहारावर निर्बंध असतानाही कार्यकर्त्यांसाठी विविध ठिकाणी मटन-चिकन पार्टीचे आयोजन धडाक्यात सुरू आहे. त्यामुळे घरच्या आचारसंहितेला छेद देत कार्यकर्ते उमेदवारांच्या पार्टीमध्ये यथेच्छ मटन-चिकनचा आस्वाद घेताना दिसत आहेत.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांप्रमाणेच नगरपरिषद निवडणुकांमध्येही विविध पक्षांचे स्टार प्रचारक मैदानात उतरले असून वातावरण तापले आहे. दिवसभर तहान-भूक विसरून प्रचार करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी उमेदवारांकडून मांसाहारी तसेच शाकाहारी जेवणाच्या स्वतंत्र सोयी केल्या जात आहेत. अनेक कार्यकर्ते सकाळ-संध्याकाळ दोन वेळा वेगवेगळ्या पार्टीमध्ये मटनावर ताव मारताना दिसत आहेत.

# हास्यसम्राटाची मिर्झा एक्सप्रेस कायमची थांबली!



वऱ्हाडी विनोदाचा बादशहा! वऱ्हाडीचा सच्चा वारसदार, मराठी-वऱ्हाडी भाषेला उंचीवर पोहोचवणारा हास्यसम्राट.... डॉ. मिर्झा रफी अहमद बेग आपल्या श्रोत्यांना अखेरचा सलाम करुन शुक्रवारी शांतपणे निघून गेले. अवघे ६८ वर्षांचे आयुष्य, पण तब्बल पन्नास वर्ष हास्यव्यंगाचा रंगमंच त्यांनी गाजवला. मिर्झा एक्सप्रेस या कार्यक्रमांच्या माध्यमातून ६ हजारावर सादरीकरण त्यांनी केले. २० पेक्षा अधिक पुस्तके, आणि लाखो हृदयांवर उमटलेल्या खळखळाटाचे ठसे....त्यांच्या जीवनाचा हाच खरा सारांश. अमरावती येथे या विदर्भाच्या सुपूत्रावर अंतिम संस्कार करण्यात आले.

------------

धनज-माणिकवाडा या यवतमाळ जिल्ह्यातील जुळ्या गावातील त्यांचा जन्म. आपल्या गावातील प्राचीन फकिरजी महाराज मंदिराचे तसेच मशीदीचेही ते विश्वस्त आहेत. सर्वसमावेशकता ही त्यांच्या घरातील संस्कारातून आली आणि ही सर्वसमावेशकता त्यांच्या कवितेतही कायम उमटत होती. त्यामुळेच हा कवी महाराष्ट्रातल्या कवी संमेलनांना नवा स्वर देणारा ठरला.

ते अनेक वाहिन्यांवरील हास्य व्यगांच्या कार्यक्रमांचे प्रमुख सादरकर्ते ठरले. महाराष्ट्राचे हास्य सम्राट म्हणून नावलौकिकास आले. वऱ्हाडी बोलीची चव, ग्रामीण साधेपणाची फोडणी आणि समाजप्रबोधनाचा ठेचा त्यांच्या सादरीकरणाची हातोटी होती. विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी पद भूषवले आहे. अनेक साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष राहिले आहेत. गेली पन्नास वर्षे हा 'मोठा माणूस 'व्यासपीठावर असून कायम कवी संमेलनाच्या केंद्रस्थानी राहिले आहेत. जांगडबुत्ता या शब्दाचे ते जनक असून याच नावाने त्यांचा काव्यसंग्रहही प्रसिध्द आहे. अवघ्या दोन ते तीन मिनिटात श्रोत्यांशी थेट एकरुप होण्याचे अजब कसब त्यांच्याकडे होते.

साधी सोपी दोन ओळीची मांडणी. त्यातून लाख मोलाचा संदेश ते द्यायचे. समाजातल्या वेगवेगळ्या विषयावर साध्या शब्दांमध्ये टीका-टिपणी करत ते हास्य निर्माण करायचे. विदर्भातील नव्वदीच्या काळात डॉ. मिर्झा अहमद बेग, डॉ. विठ्ठल वाघ, शंकर बडे यांच्यासह विदर्भातील कवींनी कविसंमेलनाला गावागावांमध्ये लोकप्रिय केले.

विठ्ठल वाघ यांची तिफण कविता, पहाडी आवाजातील मांडणी, शंकर बडे यांचा बॅरिस्टर गुलब्याचे सादरीकरण आणि डॉ. मिर्झा यांची मोठा माणूस, सातवा महिना, जांगडबुत्ता, उठ आता गणपत या कवितांनी धूम केली होती.

१९५७ सालचा त्यांचा जन्म. वयाच्या अकराव्या वर्षापासून त्यांनी काव्यलेखनाला सुरुवात केली. डॉ. मिर्झांवर सुप्रसिद्ध कवी देविदास सोटे यांच्या खुमासदार शैलीचा प्रभाव होता. १९७० पासून त्यांनी मंचावर कविता सादर करायला सुरुवात केली. त्यांच्या कवितेवर टिकाटिपणी व्हायची, मात्र सादरीकरणात ते विरोधकांना जिंकून घ्यायचे. त्यांच्याच भाषेत ते यावर भाष्य करताना म्हणायचे....

*आज जरी कवितेले किंमत नाही माया*
*लोक मले समजते फुटाणे अन् लाया*
*उद्या पहा माझ्यासाठी पुष्पक विमान येईन*
*तुकारामासारखा मले स्वर्गामध्ये नेईन*

*माहे विरोधक तवा ठंडे होऊन जातीन*
*लोकमाहे गीत मग भजनामंधी गातीन*
*म्हना लागन झक मारुन संत मिर्झा मले*
*किती मोठा माणूस आहे माहित नाही तुले*

त्यांचे सादरीकरण अतिशय साधे आणि थेट असायचे. छोट्या छोट्या गोष्टींतून साध्या कवितांची मांडणी ते करायचे. श्रोत्यांना ऐकताना कायम हसत ठेवण्याचे अजब- कसब त्यांच्याकडे होते...



*पत्ताकोबीसंग लगन करा लागलं वांग्याले*
*दुसऱ्या दिवशी दोस्ताले गंमत लागला सांगाले*
*हनिमूनमध्ये काल काही मजा नाही आली*
*पदर फेडता फेडताच बहीण सकाय झाली..*

किंवा

*कितीही दिले झोडपे आणि मारले हातोडे*
*गाढवाचे भाऊ कधी होत नाही घोडे*

अशी त्यांची सोपी मांडणी होती. मात्र, त्यांच्या कवितेतून मोठा संदेश दिला जात असे. विशेषतः त्यांच्या कविता शेती,माती, शेतकरी, कामगार यांच्यावर अधिक होत्या. शेतकऱ्यांच्या समस्या मांडताना शेतीतील नवनवीन प्रयोग कसे फसत आहेत व त्यातून शेतकरी कसा संकटात येत आहे, या संदर्भात त्यांनी उठ आता गणपत या कवितेतून मांडणी केली होती...

*'उठ आता गणपत हाती घे तूत्या*
*तू पेरतो तूती तुज्या हाती तोत्या '*

किंवा

शेतकरी समाधानी हे केवळ पुस्तकी असते
जगभऱ्याचे दुःख त्याच्या मस्तकी असते

किंवा

**प्रवीण टाके**
**उपसंचालक,**
**विभागीय माहिती कार्यालय,कोल्हापूर.**
jangadbutta@gmail.com
**9702858777**

शेतकऱ्यांना संसाराचा मेळ कसा जोडावं
कुठून घ्याव श्वास अन् गॅस कुठून सोडावं
खरिपात अलग बोलाचं वेगळं रब्बीत
डब्बा भरुन पेराचं सावडाच डब्बीत

ग्रामीण भागातील आपल्या समस्या मांडताना त्यांनी नवरा बायकोतील संवाद एका कवितेत शानदारपणे मांडला आहे. मात्र, हसता हसता अंतर्मुख करण्याची ताकदही त्यांच्या शब्दांमध्ये आहे.

*दिवस-रात्र राबतो या बुवाऱ्या पोटासाठी*
*कुठून आणू लिपस्टिक*
*तुया लाल चुटूक होटासाठी ॥*
*एक मले शर्ट आणि एकच पॅन्ट*
*नौकरी करतो ते शाळा नॉन ग्रॅन्ट*
*कपडा नाही भेटत मीटरभर कोटासाठी*
*कुठून आणून लिपस्टिक*
*या लाल चुटूक होटासाठी*
*सांज सकाय मी चटणीभर भाकर खातो*
*सुट्टीच्या दिवशी लोकांच्या कामालेबी जातो*
*ओढवाड करतो जीनगानी लोटासाठी*



*कुठून आणून लिपस्टिक*
*या लाल चुटूक होटासाठी*

ते वऱ्हाडी बोलीचे विद्यापीठ होते. हसत-हसत प्रबोधन, चिमटीत विनोद, मनात घर करणारी शैली या साऱ्या गुणांचं एकमेव संमिश्रण म्हणजे मिर्झा एक्सप्रेस.

मुसलमान असून सुद्धा मराठीत कविता लिहिण्याबद्दल कोणी त्यांना विचारलं तर ते त्यांच्या कवितेत उत्तर देत...

*मुसलमान असून येते मले मराठी*
*थोपटू नका माही पाठ याच्यासाठी*
*जो जिथे जन्मला तेच त्याची भाषा*
*पऱ्हाटीकून बोंडाचीच करानं आशा*

धर्मभेदाची त्यांची अतिशय सोपी व्याख्या होती.

*धर्माचं अन् भाषेचं काय हाय नातं*
*भाषा म्हनजे धान्य धर्म म्हणजे जातं*
*मराठीचा अभिमान मले भारताचा गर्व*
*मंदिर मशीद एकच हिंदूस्थानातील सर्व*
*हिंदू आणि मुसलमानात काय फरक*
*हा म्हनते हट जा थो म्हनते सरक*
*हा म्हनते ईश्वर तो म्हनते अल्लाह*
*हा करते गोगांट तो करते कल्ला*
*काथासंग चुना जसा असते पानात*
*हिंदू संग मुसलमान तसा हिंदुस्तानात*

किंवा

*मुसलमानानं जनम दिला हिंदू लोकात वावरलो*
*वऱ्हाडीच्या वासानं सांडावाणी बावरलो*
*मराठीचा अभिमान मले वऱ्हाडीचा गर्व !*
*मंदिर मशीद एकच मले हिंदुस्थानातले सर्व !*

मराठी भाषेवर त्यांचे अतिशय प्रेम होते. मराठी भाषेवर अनेक कविता आहेत. अनेक कविता विद्यापीठात अभ्यासालाही आहेत. भाषेच्या संदर्भात त्यांची ही कविता खूप बोलकी आहे...

*मराठीनेच तुकड्याला तुकडोजी केले..*
*गाडगेबाबा मराठीतच जन्म घेऊन गेले..*
*अमृतासंग पैज जिंकते अशी मराठी बोली..*
*आभाळाची उंची जिला समुद्राची खोली...*

६८ वर्षांच्या आयुष्यात केवळ कविता लिहून व कवितांचे कार्यक्रम करुन गुजरान करण्याची व्यावसायिकताही त्यांनी राज्यातील कवींना दिली. शेवटपर्यंत ते लिहीत होते. त्यांचे २० काव्यसंग्रह प्रसिध्द झाले आहेत. राजधानी दिल्ली पासून मुंबईपर्यंत कार्यक्रम त्यांनी केले. त्यांच्या निधनामुळे साहित्य जगाने एका अभ्यासू कवीला गमावले आहे.

वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असतानाही त्यांनी कवितेशिवाय प्रॅक्टीस केली नाही. कविता म्हणता म्हणताच आपल्याला व्यासपीठावर कवीमरण यावे, असे ते नेहमी म्हणायचे. अगदी आजारपणाच्या आधीपर्यंत ते कवीसंमेलन आणि काव्य मैफिलीत व्यस्त होते.

वऱ्हाडी भाषेला नाटकांपासून चित्रपटांपर्यंत आणि सिरीयल पासून स्टॅन्डअप कॉमेडीपर्यंत लोकप्रिय करण्याचे काम त्यांनी आपल्या वऱ्हाडीच्या जांगडबुत्यांतून केले. जवळपास तीन पिढ्या त्यांच्या काव्य मैफिलीच्या साक्षीदार आहेत. डॉ. मिर्झा, तुम्ही काव्यप्रेमींच्या स्मरणात दीर्घकाळ राहणार आहात.. डॉक्टर साहेबांना विनम्र आदरांजली..!

---

**वाचक लिहितात**

## अन्नाचा आदर करा!

अन्नाला आपल्या शास्त्रांत पूर्ण ब्रह्म म्हटले आहे. कारण अन्नातूनच शरीराला ऊर्जा ( प्राण ) मिळते.. सात्त्विक अन्न केवळ पोट भरत नाही, तर मनालाही शांत आणि पवित्र बनवते. घरी भक्तिभावाने, भगवंताचे नामस्मरण करत बनवलेले अन्न हे खऱ्या अर्थाने सात्त्विक असते.

मात्र, आजच्या धकाधकीच्या जीवनात वेळेअभावी आणि हौशेखातर उपाहारगृहात जेवण्याची प्रवृत्ती वाढत आहे. ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी अनेक मालक विविध योजना आणतात. त्यातीलच एक म्हणजे अनलिमिटेड थाळी ही संकल्पना! २०-२५ पदार्थांनी सजलेली ही थाळी पाहण्यास आकर्षक असली, तरी एका व्यक्तीसाठी ती मुळीच आवश्यक नसते.

इतक्या पदार्थांत सहजपणे पाच-सहा लोकांचे जेवण होऊ शकते. तरीही प्रत्येक व्यक्तीसाठी स्वतंत्र थाळी घेण्याची अट असते. उरलेले पदार्थ घरी नेता येत नाही. त्यामुळे उष्टे झालेले पदार्थ टाकून दिले जातात. हे दृश्य अत्यंत वेदनादायक आहे. कारण आपल्या देशात आजही हजारो लोक अर्धपोटी किंवा उपाशीपोटी झोपतात.

अतिखाणे हे आरोग्यास हानिकारक आहेच, पण अशी नासाडी ही सामाजिकदृष्ट्याही अक्षम्य आहे. म्हणूनच ह्यकिती खावे, काय खावे आणि कसे खावेह्व हे जरी व्यक्तिगत प्रश्न असले तरी उपाहारगृह चालवणाऱ्यांनी आणि ग्राहकांनी दोघांनीही याबाबत विवेकाने वागणे गरजेचे आहे. अन्नाची नासाडी म्हणजे, अन्नदात्याचा, शेतकऱ्याचा आणि निसगार्चा अपमान आहे. अन्नाला ब्रह्म मानून, जितके आवश्यक आहे तितकेच घेणे आणि आदराने ग्रहण करणे हीच खरी संस्कृती आहे.

■ **रेणुका हरदास, नागपूर.**

## राजकारणाचा स्तर किती घसरला?

नगरपालिका आणि नगरपंचारयतींच्या प्रचाराच्या रणधुमाळीत सर्वच राजकीय पक्षांचे मंत्री, बडे नेते, आमदार आपापल्या पक्षाच्या उमेदवारांचा प्रचार करताना प्रबळ विरोधी पक्षांवर टीका करताना दिसून येत आहेत. त्यात काँग्रेस, शरद पवार राकाँ आणि इतर विरोधी पक्षांचे नेते मवाळ भाषेचा वापर करीत असले तरी, सत्ताधारी भाजपाच्या काही नेत्यांकडून अत्यंत जहाल, शिवराळ आणि माज चढल्यागत भाषेचा, शब्दांचा वापर होतो आहे. भाजपाचे आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी सावनेर येथे एका प्रचार सभेला संबोधित करताना, गृहमंत्री आमचे आहेत, जास्त कराल तर कापून टाकू... अशा शब्दांचा वापर करीत विरोधकांना खुली धमकीच दिली. आश्चर्य म्हणजे भाजपाचे माजी प्रदेशाध्यक्ष तथा महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हेही या सभेला हजर होते. सत्ता आहे म्हणून या नेत्यांनी इतकी खालची पातळी गाठावी काय? अर्थात, अन्य पक्षातही असे वीर आहेतच जे अपशब्दांचा वापर करतात. पण, कापून टाकण्यापर्यंतची मर्यादा त्यांनी ओलांडली नाही. राजकारण खरेच सडत चालले आहे.

■ **निरंजन सार्वे, नागपूर.**

---

## मराठी भाषेला समृध्द करणारे साहित्यिक
# डॉ. नागनाथ कोत्तापल्ले



मराठीतील दिवंगत जेष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांचा आज स्मृतिदिन.

तीन वर्षापूर्वी आजच्याच दिवशी ३० नोव्हेंबर रोजी वयाच्या ७४ व्या वर्षी त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.

मराठी साहित्य विश्वातील एक प्रतिथयश साहित्यिक म्हणून ओळखले जाणारे डॉ. नागनाथ कोतापल्ले सरांचा जन्म २९ मार्च १९४८ रोजी नांदेड जिल्ह्यातील मुखेड या गावी झाला. डॉ नागनाथ कोत्तापल्ले यांचे शिक्षण गावातीलच जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले.

१९६९ साली डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी देगलुर येथून बी ए ची पदवी मिळवली. बी. ए. ची पदवी मिळवताना ते मराठवाड्यात तिसरे तर मराठी विषयात पहिले आले होते. त्यानंतर मराठवाडा विद्यापीठातून त्यांनी एम ए पूर्ण केले आणि १९८१ साली यु. म. पठाण सरांच्या मार्गदर्शनाखाली शंकरराव पाटील यांच्या साहित्याच्या चिकित्सक अभ्यास या विषयावर पी एच डी मिळवली.



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

१९७१ ते १९७७ या काळात त्यांनी बीड येथील महाविद्यालयात अध्यापन केले. त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले. नागनाथ कोत्तापल्ले १९७७ मध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात प्राध्यापक होते त्यानंतर ते पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख बनले. २००५ ते २०१० पर्यंत कोत्तापल्ले सर डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू होते.

डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी १९७० पासून लेखनास सुरुवात केली. मुड्स हा त्यांचा कविता संग्रह १९७६ साली प्रसिद्ध झाला. त्यानंतर कर्फ्यु आणि इतर कथा व संदर्भ हे दोन कथा संग्रह प्रकाशित झाले. कवीच्या गोष्टी आणि सावित्रीच्या लेकी या त्यांनी लिहिलेल्या दीर्घ कथा त्या काळी त्या काळात खूप गाजल्या.

या दरम्यान त्यांच्या गांधरीचे डोळे आणि मध्यरात्र या कादंबऱ्या आणि इतर बरेच ललित साहित्य प्रकाशित झाले. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी कथा, कादंबरी, ललित लेख सोबतच समीक्षा लेखनही केले.

साहित्याचा अन्वयार्थ, आधुनिक मराठी कविता, नव कथाकार शंकर पाटील, ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि बोध हे त्यांचे समीक्षात्मक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. निवडक बी. रघुनाथ आणि स्त्री पुरुष तुलना या ग्रंथाचे संपादनही त्यांनी केले.

डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी अनेक महत्वाच्या पदावर अध्यक्ष म्हणून काम केले. नॅक, राज्य मराठी विकास संस्था, साहित्य अकादमी, राज्य ग्रंथ पुरस्कार समिती, बाल पुरस्कार समिती आणि एच. एस. सी बोडार्चे मराठी अभ्यास मंडळ अशा महत्वाच्या संस्थांचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले.

याशिवाय मराठी साहित्य परिषदेचे कार्यवाहकपदही त्यांनी सांभाळले. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सर काही नियतकालिकांचे संपादकही होते. २०१२ साली चिपळूण येथे झालेल्या ८६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

जवळपास पाच दशके आपल्या समर्थ लेखणीने मराठी भाषेला समृद्ध करून डॉ नागनाथ कोत्तापल्ले सर आपल्यातून निघून गेले. त्यांच्या निधनाने मराठी विषयाची अपरिमित हानी झाली. त्यांच्या निधनाने मराठी साहित्य विश्वात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

■ ■ ■

---

# लाडकी बहीण ईकेवायसी एक जबरदस्त स्कॅम

**उत्तरार्ध**

**शब्दस्पर्शी सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली, यवतमाळ.**
**७०५७१८५४७९**

आर्थिक पाहणी सर्वेक्षण अहवालातून राज्याची गंभीर स्थिती समोर आली. म्हणजे खर्चाच्या तुलनेत उत्पन्न कमी आहे. कर्ज आणि व्याजापोटी राज्यावरील कर्जाचा डोंगर वाढत चालला आहे. यामुळे खर्च भागवताना अडचणी येत आहे.

वास्तविक पाहता अगदी सुरुवातीलाच कागदपत्रांची पडताळणी करायला हवी होती. कागदपत्रांची योग्य पूर्तता करणाऱ्या बहिणींनाच पात्र ठरवायला हवी होती. परंतु मते मिळवण्याच्या नादात अर्ज दाखल केलेल्या सरसकट महिलांना लाभ देऊन हा सर्व घोळ करण्यात आला.

मग काय? या घोळातून मार्ग काढणे तर पर्याप्त होते. परंतु त्यासाठी करायचं काय हा प्रश्न होता. मग, सुरु झाली ती सर्वच निकषांच्या आधारे अर्जाची पडताळणी...त्यात जवळपास ५० टक्के बहिणींना वगळण्यात आले. परंतु उर्वरित ५० टक्के बहिणींनाही हप्ता अदा करण्यास कठिण जाऊ लागले.

आता, ईकेवायसीची प्रक्रिया निवडण्यात आली. या प्रक्रियेमुळे योजनेत पारदर्शकता आणून गैरव्यवहार टाळता येतो आणि लाभार्थ्यांची खरी पडताळणी होते असे म्हटल्या जात आहे. परंतु या ईकेवायसीत ५० टक्क्यातील ५० टक्के कमी केल्या जाण्याचा सरळ सोपा मार्ग दिसून आला आहे.

ईकेवायसीसाठी बऱ्याच बहिणींनी आधार अपडेट केलेले आहे. त्यामुळे बहुतांश बहिणींनी आधारवरील मिस्टेक काढले आहे. जसं जन्मतारखेतील मिस्टेक, नावातील मिस्टेक आणि पत्त्यातील मिस्टेक... यामुळे आधी सादर केलेले आधार आणि आताच्या आधारमध्ये तफावत दिसून येईल. त्यामुळे काही बहिणींना वगळल्या जाईल.

दुसरा पर्याय म्हणजे प्रत्येक बहिणींनी राशन कार्डची ईकेवायसी केलेली आहे की नाही ते तपासल्या जाणार आहे. त्यामुळे यातही बऱ्याच बहिणी अडकल्या जाणार आहे.

तिसरा आणि महत्त्वाचा पर्याय म्हणजे ज्या बहिणींकडे आधार लिंक्ड पॅन कार्ड असतील, तर आधार बेसवरून पॅन कार्डवरील आर्थिक व्यवहाराचा सर्व डेटा प्राप्त करून मॅक्सिमम इन्कमचा अंदाज बांधल्या जाणार आहे.

सर्वात शेवटी सर्वच लाडक्या बहीणी आपल्या अकाउन्टला मिनिमम बॅलंस मेंटेनन्स करतात की नाही ते पाहल्या जाणार आहे. एकूणच दूरदृष्टीचा विचार करता पुढील खेळ काय असतील? हे आपल्या लक्षात आलेच असतील नाही का?

---

# सोन्याच्या खरेदी विक्रीमध्ये फसवणूक होऊ नये यासाठी काय दक्षता घ्यावी?

**सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट**

**सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा**
**सीए. आकाश जी. मुंदडा**
**जालना.**




सर्वात आधी वाचकांचे प्रश्नोतर सर्वांच्या हितासाठी देत आहोत. गेल्या आठवड्यात आपण बघितले की सोन्याचे टुकडे किंवा रत्न याच्यावर गोल्ड मॉनीटायझेशन स्कीम वर व्याज मिळु शकते का? तसेच व्याज व भांडवली नफा मिळविण्यासाठी नेमकी काय प्रोसिजर करावी लागेल?

**प्रश्न** - आपण सोन्याविषयी माहिती देत आहात, धन्यवाद. माझा प्रश्न खालील प्रमाणे आहे. ९ नोव्हेंबरला सोन्याचा भाव १० ग्रॅम साठी १,२०,८००/- असे मुंबई संद्यानंद मध्ये दर्शविले आहे. ग्राहकाला या वर किती व कोणते टॅक्स द्यावे लागतील? एकुण किती रक्कम होईल? समजा ग्राहकाने त्याचे १० ग्रॅम २४ कॅरेट सोने पेटीवाल्याला विकले तर त्याला किती रक्कम मिळेल? यातील फरक किती रकमेचा असू शकतो व कशा मुळे?

**विजय घुमरे, जेष्ठ नागरिक**
**शहापुर, (ठाणे)**
**7057937251**

आपण एका प्रश्नातच खूप काही विचारले आहे. १० ग्रॅम साठी १,२०,८००/- हा सोन्याचा ९ नोव्हेंबर २०२५ चा भाव आपण सांगितला समजा तुम्ही त्याच दिवशी १० ग्रॅम सोन विकल तर या विक्री किमतीतून १० ग्रॅम ची खरेदी किंमत वजा करावी नंतर येणाऱ्या नफ्यावर जो इन्कमटॅक्स लागेल त्याला कॅपीटल गेन (भांडवली नफा) म्हंटले जाईल. याच्या माहितीसाठी आपण जुने अंक वाचावेत.

ही रक्कम किरकोळ असली तरी इतर उत्पनात जोडून त्या एकूण उत्पन्नावर इन्कमटॅक्स लावले जाईल. जर हेच सोनं गोल्ड मॉनीटायझेशन योजनेत असेल तर मिळणाऱ्या व्याजावर इन्कमटॅक्स तथा भांडवली टॅक्स लागणार नाही तुमचे खरेदीचे आकडे तथा विक्रीचे आकडे, भाव, क्वॉटिटी (वजन) या वर सर्व अवलंबून राहील व त्या अनुसार टॅक्स लागेल.

तुमचा शेवटचा प्रश्न आहे की पेटीवाला सोन्याच्या खरेदी विक्रीत किती फरक ठेवू शकतो. या साठी मार्केट मध्ये किंमत अशी ठरवलेली नसते त्या वर थोडा फार फरक प्रत्यक पेटीवाल्याकडे असतो. आपला ज्या पेटीवाल्यावर विश्वास आहे, त्याच्याकडे बिल घेऊन असा खरेदी विक्रीचा व्यवहार केल्यास सहसा तुमची फसवणूक होण्याचे शक्यता कमी होते एकंदरीत टॅक्स साठी सर्व खरेदी-विक्रीचे पूर्ण आकडे असणे आवश्यक आहे.

यात एक मुद्दा नोट करावा की टॅक्स लागण्यासाठी विक्री करणे आवश्यक आहे. जर सोने आपल्याजवळच आहे आणि भाव वाढत आहे तर या वाढलेल्या भावावर कोणताही टॅक्स लागत नाही. हे आकडे घेऊन आपण ओळखीच्या तज्ञ माणसाचा सल्ला प्रत्यक्ष भेटून घ्यावा.

पुढील आठवड्यात आपण बघणार आहोत की गोल्ड मॉनीटायझेशन स्कीम २०१५ आणि गोल्ड डीपॉजीट स्कीम १९९९ या दोन्ही स्कीम मध्ये काय फरक आहे? नवीन स्कीम जुन्या स्कीमच्या तुलनेत चांगली आहे का? इत्यादी व्यावहारिक प्रश्नांची उत्तरे सविस्तर दिली जातील. ज्या वाचकांचे काही प्रश्न असतील त्यांनी सविस्तर प्रश्न ९४२२२१८४२८ वर फोन न करता फक्त वाट्सअॅप करावे, म्हणजे त्यांचे उत्तर याच वृत्तपत्रात निःशुल्क दिले जाईल.

■ ■ ■

---

# हिवाळ्यात दररोज भिजवलेले बदाम आणि अंजीर खाल्ल्यास जबरदस्त फायदे





हिवाळा सुरू झाल्याने आपण प्रत्येकजण शरीराला आतून उबदार ठेवण्यासाठी आहारात गरम पदार्थांचे समावेश करतात. शरीराला उबदार ठेवण्यासाठी आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी नट्स हे सर्वोत्तम स्त्रोत मानले जातात.

तुम्ही मनुका, बदाम, अंजीर आणि खजूर यांसारखे नट्स खाऊ शकता. हे सर्व नट्स त्यांच्या वेगवेगळ्या पौष्टिकतेसाठी आणि फायद्यांसाठी ओळखले जातात. मात्र जेव्हा शरीराला उबदार ठेवण्याचा विचार येतो तेव्हा बदाम आणि अंजीर हे सर्वोत्तम पर्याय मानले जातात. मात्र काही लोकं हिवाळ्यात रिकाम्या पोटी बदाम की अंजीर खाणे जास्त फायदेशीर आहे यामध्ये संभ्रमात असतात.

### अंजीर हे लोहाचे उत्तम स्त्रोत आहेत

अंजीर हे एक पौष्टिक सुके फळ आहे आणि ते लोहाचा एक उत्कृष्ट स्त्रोत मानले जाते. त्यात फायबर, कॅल्शियम, पोटॅशियम, बी जीवनसत्त्वे आणि अँटिऑक्सिडंट्स देखील असतात. अंजीरमध्ये उष्णता निर्माण करणारा प्रभाव असतो, ज्यामुळे ते हिवाळ्यात खाण्यासाठी सर्वोत्तम बनतात. अशक्तपणाने ग्रस्त असलेल्यांसाठी अंजीर खाणे खूप फायदेशीर ठरू शकते. ते दररोज खाल्ल्याने पचन सुधारते, अशक्तपणा कमी होतो आणि रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत होते.

### बदामातील पोषक घटक

बदाम हे फायबरचा एक उत्तम स्त्रोत मानले जातात. बदाम दररोज खाल्ल्याने तुमची पचनसंस्था मजबूत होण्यास मदत होते. कारण यात निरोगी फॅट, व्हिटॅमिन ई, प्रथिने, मॅग्नेशियम आणि अँटीऑक्सिडंट्स देखील असतात. फायबरमध्ये समृद्ध असल्याने बदाम तुम्हाला जास्त काळ पोट भरल्यासारखे वाटण्यास मदत करतात, वारंवार भूक लागणे टाळतात आणि तुमचे वजन नियंत्रित करण्यास मदत करतात.

### बदाम की अंजीर? रिकाम्या पोटी काय खावे?

आयुर्वेद तज्ञ सांगतात की बदाम आणि अंजीर हे दोन्ही उबदार नट्स आहेत. यासाठी ते हिवाळ्यात खाण्यासाठी खूप चांगले मानले जातात. मात्र त्यांचे पौष्टिकता वेगळे वेगळे आहेत.

बदाम हे फायबरचे एक उत्तम स्त्रोत आहेत, तर अंजीरमध्ये भरपूर प्रमाणात लोह असते. बदाम खाल्ल्याने स्मरणशक्ती सुधारते, ऊर्जा वाढते आणि वजन नियंत्रित होण्यास मदत होते.

अंजीर अशक्तपणा कमी करण्यास, बद्धकोष्ठता दूर करण्यास आणि श्वसन प्रणाली मजबूत करण्यास देखील मदत करतात. हिवाळ्यातील गरजांनुसार तुम्ही यापैकी कोणताही एक नट्स निवडू शकता.

तज्ञ सांगतात की जर तुम्हाला सकाळी रिकाम्या पोटी बदाम किंवा अंजीर खायचे असतील तर ते रात्रभर भिजवून खा.

तुम्ही बदाम सोलून संपूर्ण खाऊ शकता. अंजीर कच्चे खाऊ शकता. तुम्ही ४-५ बदाम आणि २ अंजीर खाऊ शकता. सकाळी त्यांचे सेवन केल्याने दिवसभर ऊर्जा टिकून राहते, रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते आणि शरीराला उबदारपणा आणि शक्ती मिळते.

■ ■ ■

---

**अशोकायन**

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



## गहरी चाल!

**एनकेन प्रकारे सत्ता मिळवावी**
**हेच आमचे टारगेट**
**कुणी कुणाचं हाडवैरी नसतो**
**खुशाल घ्यावी गळाभेट..**

**तु मारल्या सारखं कर**
**मी रडल्यासारखं करतो**
**चला सारे मिळून जनतेला**
**'एप्रील फूल' बनवतो..**

**कीती आले निवडून उमेदवार**
**फरक पडणार नाय**
**कारण युतीच करू आपण**
**सत्ता आपलीच राहणार हाय..**

**राजनीतीची आम्ही**
**करतोच अशी आखणी**
**चक्रव्युहात फसेल जनता**
**येईल आमच्याच चरणी!**

# न.प., न.पं. निवडणूक; ग्रामीण पोलीस अलर्ट मोडवर

## 2 डिसेंबरला मतदान, 3 डिसेंबरला मतमोजणी

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,( दि.29 )**- राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार अमरावती ग्रामीण विभागातील 10 नगरपरिषद आणि 2 नगरपंचायतींसाठी 2 डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. तर 3 डिसेंबरला मतमोजणी पार पडणार आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामीण पोलिसांनी संपूर्ण क्षेत्रात कडेकोट सुरक्षा व्यवस्था तैनात करत दहापट तयारी आरंभली आहे.

धामणगाव रेल्वे, चांदूर रेल्वे, चांदूर बाजार, अंजनगाव, दर्यापूर, अचलपूर, मोर्शी, वरुड, चिखलदरा आणि शेंदुरजना घाट या 10 नगरपरिषदांसह धारणी व नांदगाव खंडेश्वर या दोन नगरपंचायतींसाठी नगराध्यक्ष व नगरसेवक पदांची निवडणूक होत आहे. मतदानादरम्यान गोंधळ, गैरप्रकार अथवा कायदा व सुव्यवस्थेचा भंग होऊ नये यासाठी पोलिसांनी काटेकोर रणनीती आखली असून विशेष पथके सक्रिय करण्यात आली आहेत.



### मतदान केंद्रांसाठी पोलिसांचा बंदोबस्त

6 उपविभागीय पोलीस अधिकारी
117 पोलीस अधिकारी
1,453 पोलीस अंमलदार
900 होमगार्ड

### दोन हजारांहून अधिक पोलिसांचे सुरक्षा कवच

निवडणूक सुरक्षेसाठी दंगा नियंत्रण पथक, एक शिघ्र कृती दल, राज्य राखीव पोलीस दलाची एक कंपनी आणि दोन प्लाटून तैनात आहेत. निवडणूक खर्च निरीक्षण व आचारसंहिता नियंत्रणासाठी 27 एसएसटी (स्टॅटिक सर्व्हिलन्स टीम), 22 एफएसटी (फ्लाइंग स्क्वॉड टीम), 16 व्हीएसटी (विधी शाखा टीम) आणि 20 सेक्टर पेट्रोलिंग पथके कार्यरत केली आहेत.

### मतदार केंद्रावर भक्कम बंदोबस्त

मतदान केंद्रांसाठीही भक्कम बंदोबस्त उभारण्यात आला आहे. 6 उपविभागीय पोलीस अधिकारी, 117 पोलीस अधिकारी, 1,453 पोलीस अंमलदार आणि 900 होमगार्डची नेमणूक करण्यात आली आहे. संवेदनशील, अतिसंवेदनशील व सामान्य केंद्रांवर विशेष लक्ष ठेवत गस्त वाढवण्यात आली आहे. अमरावती ग्रामीण पोलिसांच्या या नियोजनामुळे मतदान प्रक्रिया शांततामय आणि सुरळीत पार पडेल, अशी अपेक्षा आहे.दंगा नियंत्रण पथक, 1 शिघ्र कृती दल, राज्य राखीव पोलीस दलाची 1 कंपनी आणि 2 प्लाटून तैनात करण्यात आले आहेत. निवडणूक खर्च निरीक्षण व आचारसंहिता नियंत्रणासाठी 27 एसएसटी (स्टॅटिक सर्व्हिलन्स टीम), 22 एफएसटी (फ्लाइंग स्क्वॉड टीम), 16 व्हीएसटी (विधी शाखा टीम) आणि 20 सेक्टर पेट्रोलिंग पथके कार्यरत आहेत.

# चांदूरबाजार तालुक्यात अदानी कंपनीविरुद्ध शेतकऱ्यांचे ठिय्या आंदोलन

महासागर | प्रतिनिधी

**चांदूर बाजार,( दि.29 )** - तालुक्यातील पिंपरी पूर्णा येथील शेतकऱ्यांच्या जमिनी व उभ्या पिकांचे मोठे नुकसान झाल्याचा आरोप अदानी कंपनीवर करण्यात आला असून, या अन्यायाविरुद्ध शेतकरी ठिय्या आंदोलनाला बसले आहेत. कंपनीने शेतजमिनी ताब्यात घेतल्या आणि पिकांचे नुकसान केले, मात्र त्याबदल्यात कोणताही मोबदला न दिल्याने शेतकरी संतप्त आहेत. तालुका दंडाधिकारी कार्यालयात वारंवार धावपळ करूनही न्याय न मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोष वाढला आहे. लोक विकास संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गोपाल भालेराव आणि मुख्य संघटक रमण लंगोटे यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदार कार्यालयात हे ठिय्या आंदोलन सुरू झाले. शेतकऱ्यांनी जोरदार घोषणाबाजी करत तात्काळ नुकसानभरपाईची मागणी केली. मोबदला मिळाला नाही तर आत्मविनाश करू, असा इशाराही काही शेतकऱ्यांनी दिल्याने वातावरण अधिक तणावपूर्ण बनले. दरम्यान, शांततेत सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान पोलिसांनी गुन्हे दाखल होऊ शकतात, असे सूचित केल्याने आंदोलक संतापले. यावरून आंदोलक आणि पोलिसांमध्ये तीव्र वाद निर्माण झाला. तरीही शेतकऱ्यांनी आंदोलन मागे न घेण्याचा निर्धार कायम ठेवला. शेतकऱ्यांचा आरोप आहे की प्रशासन व कंपनीच्या निष्क्रियतेमुळे त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून आता सहनशक्ती संपली आहे. शासनाने त्वरित हस्तक्षेप करून योग्य मोबदला द्यावा, अन्यथा सोमवारपर्यंत निर्णय न झाल्यास आत्महत्येचा मार्ग स्वीकारण्याचा इशारा त्यांनी तहसीलदारांना दिला. या आंदोलनात गोपाल भालेराव, रमण लंगोटे, गौरव किटुकले यांच्यासह अनेक शेतकरी सहभागी झाले होते.



# चेतना बेलसरेंच्या विजयासाठी माजी आमदार मैदानात!

## डोअर-टू-डोअर प्रचाराला मतदारांचा उस्फूर्त प्रतिसाद



### वरुडमध्ये राष्ट्रवादीची लाट ?

महासागर | प्रतिनिधी

**वरुड,( दि.29 )** - वरुड नगरपरिषद निवडणुकीची रणधूमाळी शिगेला पोहोचत असताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) उमेदवार चेतना राहुल बेलसरे यांच्या विजयासाठी माजी आमदार देवेंद्र भुयार यांनी केलेली झंझावाती घोडदौड चांगलीच गाजत आहे. घर-घर पोहोचणाऱ्या या प्रचार मोहिमेला मतदारांकडून मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता राष्ट्रवादीच्या तंबूत उत्साह चांगलाच उफाळून आला आहे.

भुयारांचा धडाकेबाज प्रचारज वरुडची राजकीय समीकरणे हलली!

माजी आमदार म्हणून स्वत:चे काम, संपर्क आणि लोकांतील आत्मीयता याचा योग्य वापर करत देवेंद्र भुयार हे चेतनाताईंच्या प्रचाराची सूत्रे हाती घेताच निवडणूक रंगतदार झाली. भुयार यांच्या भेटीगाठी, छोट्या सभा, तसेच वैयक्तिक संवाद साधण्याच्या खास शैलीमुळे अनेक अनिर्णित मतदार राष्ट्रवादीच्या दिशेने वळत असल्याची चर्चा शहरभर रंगली आहे.



### भुयारांचा झंझावात विरोधकांना धडकी भरवणारा!

भुयार यांच्या मैदानात उतरल्यापासून विरोधकांचे पाय बळावेत की डगमगावेत असा प्रश्न वारंवार उपस्थित होत आहे. राष्ट्रवादीने उभ्या केलेल्या संघटित प्रचारयंत्रणेची ताकद विरोधकांना स्पष्टपणे जाणवत असल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

### जनतेचा कौल - 'या वेळी विकासाच्या बाजूने!'

मतदारांच्या प्रतिक्रिया लक्षात घेतल्या तर या निवडणुकीत विकास, स्वच्छ प्रशासन, आणि स्त्री-शक्तीला संधी या मुद्यांवरच जनमत एकवटत आहे. भुयार आणि चेतना बेलसरे यांच्या नेतृत्वावर लोकांचा वाढता विश्वास पाहता, राष्ट्रवादीचा विजयाचा मार्ग सुकर होत असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.

### शेवटचा टप्पा निर्णायक- राष्ट्रवादीची पकड मजबूत!

निवडणूक अवघ्या काही दिवसांवर आल्यानंतर राष्ट्रवादीच्या तंबूत दिसणारी दमदार तरतूद, संघटित प्रचार, आणि मतदारांमधील उत्साह यामुळे चेतना राहुल बेलसरे यांच्या विजयाची शक्यता अधिक बळकट झाल्याचे चित्र आहे.

### डोअर-टू-डोअर दौऱ्यात महिलांचा, युवकांचा उत्स्फूर्त सहभाग

चेतना बेलसरे यांच्या उमेदवारीनंतर विशेषत: महिला मतदारांमध्ये सकारात्मक लाट दिसत आहे. त्यांच्या संघटनेतील सक्रियता, सामाजिक कामातील सहभाग आणि सर्वसामान्यांसाठी काम करण्याच्या वचनामुळे प्रचारात महिलांनी मोठी उर्जा दाखवली आहे. युवकांमध्येही भुयार-चेतना जोडीबाबत अपेक्षांची चाहूल लागली असून त्यांच्या टीमचा डोअर-टू-डोअर दौरा लोकांच्या पटांगणात केंद्रबिंदू ठरत आहे.

# वरुड-शेंदूरजनाघाट न.प.मध्ये कमळ फुलवणारच!

## आमदार उमेश यावलकरांचा झंझावात



सुवर्णा वरखडे शेंदूरजनाघाट



ईश्वर सलामे, वरुड

महासागर | प्रतिनिधी

**वरुड, ( दि. 29 ) - नगरपरिषद निवडणुकांच्या रणधुमाळीत भाजपाने आपली ताकद झोकून दिल्याचे चित्र स्पष्टपणे दिसू लागले आहे. वरुडमध्ये नगराध्यक्ष पदासाठी उच्चविद्याविभूषित उमेदवार ईश्वर शिवकुमार सलामे तर शेंदूरजनाघाटमध्ये सुवर्णा वरखडे यांना विजयश्री मिळवून देण्यासाठी आमदार चंदू उर्फ उमेश यावलकर यांनी अक्षरश: झंझावात उडवला आहे.**

### आमदार यावलकरांचा पोलादी आत्मविश्वास

दोन्ही नगरपरिषदांमध्ये भाजपाच्या बाजूने हवा निर्माण होत असून कमळ फुलवणारच हा आमदार यावलकरांचा आत्मविश्वास अनेकांची दृष्टी वेधून घेत आहे. विरोधकांवर टीका न करता विकासाच्या मुद्द्यांवर निवडणूक लढण्याची त्यांची भूमिका जनतेला अधिक भावते आहे.

त्यांच्या आक्रमक प्रचारशैलीमुळे दोन्ही नगरपालिकांत कमळ फुलण्याचे संकेत अधिक ठळक होत आहेत.निवडणुकीचा काऊंटडाऊन सुरू असताना प्रचारात वेग, नेतृत्वातून दिसणारा आत्मविश्वास आणि कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झालेली ऊर्जा पाहता वरुड व शेंदूरजनाघाट दोन्ही ठिकाणी भाजपाचा विजय हा चर्चेचा मुख्य विषय ठरत आहे. आगामी काही दिवसांत प्रचाराला आणखी धार मिळणार असून दोन्ही नगरपालिकांवर कमळ फुलण्याची चिन्हे अधिकच गडद होत आहेत.

### यावलकरांच्या प्रचारशैली निर्णायक

गेल्या काही दिवसांपासून आमदार यावलकर हे वरुड व शेंदूरजनाघाट परिसरात घराघरात संवाद साधत आहेत. पक्षाच्या धोरणांची माहिती, विकासाच्या कामांचे लेखाजोखा आणि आगामी पाच वर्षांची भक्कम दृष्टी यांचे ते जनतेसमोर प्रबोधन करत आहेत. यावलकर यांची जनसंपर्कातील ताकद, सूक्ष्म नियोजन आणि प्रत्येक मतदाराशी साधलेला थेट संवाद हा भाजपासाठी निर्णायक ठरत असल्याचे जाणकारांचे मत आहे.

### ईश्वर सलामेंना सुशिक्षित नेतृत्वाची साथ

वरुड येथील भाजप उमेदवार ईश्वर शिवकुमार सलामे हे उच्चशिक्षित, दूरदृष्टीचे आणि संघाशी सतत कार्यरत असलेले उमेदवार म्हणून ओळखले जातात. शहरातील पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा, स्वच्छता व स्मार्ट व्यवस्थापन या मुद्यांवर त्यांनी तयार केलेल्या कारवाई आराखड्याला जनतेचा चांगला प्रतिसाद मिळू लागला आहे.

### सुवर्णा वरखडे शेंदूरजनाघाटमधील सक्षम चेहरा

शेंदूरजनाघाटमध्ये सुवर्णा वरखडे यांनी अल्पावधीतच मजबूत पकड निर्माण केली आहे. महिलांमधील त्यांचा प्रभाव, विविध सामाजिक उपक्रमांतून निर्माण केलेला विश्वास आणि विकासाभिमुख भूमिकेमुळे त्यांचे उमेदवारीपत्र सध्या चर्चेत आहे. त्यांच्या समर्थनार्थ भाजपात विशेष उर्जा दिसत असून तरुणांमध्ये कमळाच्या बाजूने स्पष्ट कल दिसू लागला आहे.

# अमरावती ग्रामीणमध्ये 14 डिसेंबरपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश लागू

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि.29 )**- अमरावती ग्रामीण जिल्ह्यात येणाऱ्या नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुका, विविध संघटनांची संभाव्य आंदोलने तसेच 6 डिसेंबर रोजी होणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त होणाऱ्या कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर कायदा-सुव्यवस्था सुरळीत राखण्यासाठी जिल्हादंडाधिकारी आशिष येरेकर यांनी प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 चे कलम 37 (1) व 37 (3) अन्वये हा आदेश 29 नोव्हेंबर रोजी रात्री 00.01 पासून 14 डिसेंबर रोजी रात्री 24.00 पर्यंत अमरावती ग्रामीण भागात लागू राहणार आहे. पोलीस आयुक्तालय क्षेत्र यामधून वगळण्यात आले आहे.

निवडणूक प्रचारादरम्यान स्टार प्रचारकांचे दौरे, मोठ्या सभा, 2 डिसेंबर रोजी मतदान, 3 डिसेंबरला मतमोजणी आणि 4 व 5 डिसेंबर रोजी विजयी मिरवणुकांदरम्यान कायदा-सुव्यवस्थेचा संभाव्य ताण असल्याचा अहवाल पोलीस अधिक्षकांनी सादर केला होता. तसेच महापरिनिर्वाण दिनानिमित्त कॅण्डल मार्च, धार्मिक कार्यक्रम आणि विविध मागण्यांसाठी अचानक आंदोलने उभे राहण्याची शक्यता लक्षात घेऊन हा आदेश लागू केला आहे. कलम 37 (1) अंतर्गत शस्त्रे, लाठी, जीवितहानी होऊ शकणाऱ्या वस्तू, दगड-विटांचा साठा, पुतळे प्रदर्शित करणे, घोषणा-गोंधळ करणे यांवर बंदी आहे. तर कलम 37 (3) अंतर्गत कोणत्याही मिरवणुकीस मनाई असून अत्यावश्यक असल्यास लेखी परवानगी आवश्यक आहे. शासकीय-निमशासकीय कामे, धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रम, लग्नसमारंभ, आठवडी बाजार आणि अंत्ययात्रेला सूट देण्यात आली आहे. आदेशाचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# डॉ. मिर्झा यांना अभिवादनासाठी आज श्रद्धांजली सभा

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,( दि.29 )** - 'हास्य सम्राट', 'मिर्झा एक्सप्रेस' डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांचे 28 नोव्हेंबरला निधन झाले.उद्या रविवारी दिनांक 30 नोव्हेंबर रोजी त्यांना अभिवादन करण्यासाठी अभियंता भवन, शेगाव नाका चौक, अमरावती येथे श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

उद्या रविवारी सकाळी साडे दहा ते एक वाजेपर्यंत अभियंता भवन, शेगाव नाका,येथे ही श्रद्धांजली सभा होणार आहे. डॉ.मिर्झा यांच्यावर प्रेम करणाऱ्या श्रोत्यांनी, रसिकांनी मोठ्या संख्येने या श्रद्धांजली सभेला उपस्थित राहावे,असे आवाहन आयोजकांनी केले आहे. गेल्या 50 वर्षांपासून विविध विचारपीठांवरून ,कवी संमेलनातून, तीन पिढ्यांचे मनोरंजन व प्रबोधन करणारे डॉ. मिर्झा यांचे वयाच्या 68 व्या वर्षी 28 नोव्हेंबरला दीर्घ आजाराने निधन झाले. विदर्भ, मराठवाडा व महाराष्ट्रातील त्यांच्या अनेक चाहत्यांना त्यांच्या प्रति आपल्या संवेदना व्यक्त करता याव्यात यासाठी डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांच्यावर प्रेम करणाऱ्या त्यांच्या अनुयायी मित्र मंडळांनी हे आयोजन केले आहे. उद्या ठीक साडेदहा वाजता या कार्यक्रमाला सुरुवात होईल. त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करणे, काव्य श्रद्धांजली व्यक्त करणे, कुटुंबाच्या सदस्यांची भेट घेणे व मान्यवरांकडून श्रद्धांजली अर्पण करणे असे या श्रद्धांजली सभेचे स्वरूप आहे. रसिक श्रोत्यांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ.मिर्झा रफी अहमद बेग मित्र मंडळाने केले आहे.




# नगरपरिषद निवडणूकीत आचारसंहितेचा सर्रास भंग

## 'फिरते पथक' केवळ नावापुरतेच ?

महासागर | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी, ( दि.29 )**- नगरपरिषद निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचत असताना शहरात आचारसंहितेच्या नियमांची धज्जा उडवल्याचे गंभीर चित्र समोर आले आहे. सार्वजनिक मालमत्तेचे विद्रूपीकरण करून ठिकठिकाणी झेंडे व प्रचार साहित्य लावण्यात आले असून, निवडणूक आयोगाच्या फिरत्या पथकाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.




### निष्क्रिय फिरते पथक : नागरिकांमध्ये संताप

आचारसंहिता लागू झाल्यानंतर 'झिरो टॉलरन्स' धोरण राबवणे अत्यावश्यक असते. फिरते पथक शहरात सतत गस्त घालून लगेचच झेंडे काढणे व दोषींवर कारवाई करणे अपेक्षित आहे. मात्र, अंजनगावात हे पथक प्रत्यक्षात कार्यरत नसल्याचे दिसत आहे. शहराच्या मध्यवर्ती भागापासून उपनगरांपर्यंत अनेक ठिकाणी झेंडे काही दिवसांपासून लटकलेलेच आहेत. आचारसंहिता केवळ सर्वसामान्यांसाठीच आहे का ? प्रशासनाचे दुर्लक्ष की राजकीय मिलीभगत ? असा सवाल नागरिक करत आहेत.

### शासकीय नियमांचे उघड उल्लंघन

आचारसंहितेनुसार शासकीय, निमशासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालमत्तेचा वापर प्रचारासाठी करण्यास सक्त मनाई आहे. तरीही या नियमांचे खुले उल्लंघन सुरू असून प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

### ठोस कारवाईची मागणी

आचारसंहितेचा भंग करणाऱ्यांवर लोकप्रतिनिधित्व कायदा 1951 अंतर्गत गुन्हा दाखल करणे बंधनकारक आहे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी तत्काळ हस्तक्षेप करून फिरत्या पथकांना सक्रिय करावे तसेच उल्लंघन करणाऱ्या उमेदवारांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी शहरवासीयांची मागणी आहे.

### सार्वजनिक ठिकाणे बनली 'प्रचारभूमी'

शहरातील मुख्य चौक, उद्यानांचे कठडे, सरकारी कार्यालयांच्या भिंती, तसेच रस्त्यांवरील विजेचे खांब या सर्व सार्वजनिक जागांवर विविध पक्षांनी कब्जा केला आहे. अनेक मार्गांवरील विजेच्या खांबांना दोऱ्या बांधून पक्षाचे झेंडे लावण्यात आले आहेत. बसस्थानके आणि इतर सार्वजनिक इमारतींच्या भिंतींवरही झेंडे ठोकल्याने त्यांची शोभा हरवली आहे.

# अमोल पेठे अपघात प्रकरणी पोलिस प्रशासनावर संताप

## अवैध मुरुम वाहतूक सुसाट

महासागर | प्रतिनिधी

**चांदूर बाजार,( दि.29 )** - घाटलाडकी फाटा टी-पॉइंटवर गुरुवारी सकाळी 10 वाजता झालेल्या अपघातात मृत्यू झालेल्या अमोल दादाराव पेठे (42, रा. सावतापुरा, ब्राह्मणवाडा थडी) यांच्यावर काल दुपारी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

कुटुंबीयांसह ग्रामस्थांच्या उपस्थितीत हंबरडा फोडणारे दृश्य पाहून सर्वांच्या डोळ्यात अश्रू होते.

या अपघातास कारणीभूत ठरलेल्या बेफाम मुरूम वाहतुकीबद्दल नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. एमएच 27/ डीटी 1830 क्रमांकाचा टीप्पर अवाजवी वेगाने चालविला जात असल्याने अमोल पेठे यांचा जागीच मृत्यू झाला. प्रकरणी चालक एजाज अहमद (45, रा. रिस्तापूर) याच्याविरोधात 304 अ, 279 भा.द.वि., तसेच मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ब्राह्मणवाडा थडी परिसरात अवैध गौण खनिज वाहतूक दीर्घकाळ सुरू असूनही कारवाई शून्य असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला.

महसूल विभागाने कोट्यवधींचे दंड ठोठावले असताना पोलिसांची भूमिका 'बघ्याची' असल्याचे लोक म्हणत आहेत. प्रादेशिक परिवहन विभागाकडूनही ओव्हरलोड टिपरवर कोणतीही कारवाई होत नसल्याची खंत व्यक्त होते. अमोल यांच्या मृत्यूने अवैध मुरूम वाहतूक ही नागरिकांच्या जीवाला थेट धोका बनल्याचे पुन्हा स्पष्ट झाले आहे. अजून किती जीव गेल्यावर प्रशासन जागे होणार ? असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.



RNINO-46975/1985 Dainik Mahasagar Amravati

Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक

# भक्तिमार्ग

**सुमारे पाच हजार वर्षांपूर्वी कुरूक्षेत्रावर अर्जुनाला सांगितला गेलेला संदेश गीतेच्या रुपाने सर्वसामान्यांपर्यंत पोहोचला आणि समस्त मानवजातीला आत्मबोधाचा मार्ग गवसला. गीता जयंतीच्या निमित्ताने गीतेचं स्मरण अपरिहार्य आहेच पण वाचनापेक्षा त्यातील विचार आणि उपदेशाचं अवलंबन गरजेचं आहे. कारण सध्या आपला अवघा परीघ कुरुक्षेत्रासम रणभूमी बनला आहे. तिथे टिकाव धरण्यासाठी गीतेचा संदेश अंगिकारायला हवा.**

## शिकवण गीतेची



भक्ती विशेष

पंकजा देव.

युध्यस्य कथा रम्या' या धर्तीवर आजवर भारतभूमीतच नव्हे तर जगभरात लढल्या गेलेल्या युद्धाच्या सुरस आणि थरारक कथा आपल्याला ज्ञात आहेत. दोन प्रवाह, दोन विचारधारा, दोन अहंकारी व्यक्तिमत्त्व, अतितीव्र महत्त्वाकांक्षा, कमालीची कटुता समोरासमोर उभी ठाकते तेव्हा युद्धाला तोंड फुटतं. म्हणजेच हा टोकाच्या विचारांमधला संघर्ष असतो. युद्धात केवळ ताकदवान पक्षांचीच सरशी होते असं नाही तर स्तुत्य आणि व्यवहार्य विचारांची, विवेकाची, धर्माची सरशी होते कारण अशा पक्षापाठी सत्याचा खंबीर आधार असतो. म्हणूनच वरकरणी कमकूवत समजला जाणारा हा पक्ष प्रत्यक्षात वीरश्री खेचून घेताना दिसतो. युद्धांच्या इतिहासाचा माग-ावा घेता ही बाब प्रकर्षाने जाणवते. असं असताना कुरुक्षेत्रावर कौरव-पांडवांमध्ये झालेला संघर्ष, या चुलत भावंडांच्या वैरामध्ये ओढले गेलेले आप्तस्वकीय, त्यावेळी टाकले गेलेले डावपेच, आखलेली युद्धनीती आणि या सर्वांमुळे मिळालेला परिणाम हा तर गांभीर्याने अभ्यासावा असा विषय ठरतो. कारण हा एका घरातील संघर्ष असला तरी हे घर कौरव-पांडवांचंच नव्हे तर तुमचं-आमचंही असतं. आपल्यापैकी काही जणांमध्ये दुर्योधनाच्या मनात होती तशी लालसा असते. धर्मराजाप्रमाणे काही कमालीचे उदारमतवादी असतात. वचनपूर्तीसाठी अस्मिता पणाला लावण्यासही ते मागे-पुढे पहात नाही. इथे मित्रत्वाच्या नात्याने बांधला गेलेला कोणी कौंतेय असतो तर अपराधांची हद्द ओलांडणारा शिशुपालही असतो. त्यामुळेच हा संघर्ष केवळ कुरुक्षेत्रावरच नव्हे तर घराघरात पहायला मिळतो. अशा वेळी गरज असते ती आपल्या भावभावनांचं सारथ्य करणाऱ्या कोण्या घन:श्यामाची. युद्धात हाती शस्त्र न घेण्याचं धोरण अवलंबलं तरी त्याने केलेलं मार्गदर्शन, केलेलं दिशादर्शन परिस्थितीला कलाटणी देऊन जातं. हे वास्तव आहे म्हणूनच पाच हजारांपेक्षा जास्त काळ उलटून गेला तरी गीताजयंती साजरी केली जाते. या निमित्ताने त्या दिव्य संदेशाचं स्मरण केलं जातं. श्रीकृष्णाने अर्जुनाला युध्दभूमीवर केलेला उपदेश हे जीवनाचे सार आहेच त्याचबरोबर धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक इतिहासाचं सारही आहे. म्हणूनच संत ज्ञानेश्वर म्हणतात

आता भारती कमळ परागु ।
गीताख्यु प्रसंग ।।

महाभारत हे कमळ मानलं तर गीता हा त्यातील पराग आहे.

युद्धाच्या वेळी द्विधा मन:स्थितीतील अर्जुनाला कृष्णाने जे मार्गदर्शन केलं तीच 'गीता' होय. गी-तेत सुखाचे तीन वर्ग केले आहेत- सात्विक, राजस आणि तामस. जे सुख प्रथम विषासारखं वाटतं, पण नंतर गोड असतं तेच सात्विक. आत्मनिष्ठ बुद्धीच्या प्रसन्नतेपासून हे सात्विक सुख मिळतं. राजस सुख प्रथम अमृतासारखे असतं पण शेवटी विषास-ारखं परिणाम देतं. तामस सुख हे निद्रा, आळस आणि प्रमास यापासून उत्पन्न होतं. शिवाय ते प्रारंभी आणि शेवटी माणसाला मोहात पाडतं. या सुखात माणूस गुंतून पडतो. सुख आणि दु:ख या एकाच नाण्याच्या दोन भिन्न बाजू. सुख कितीही मिळालं तरी कमीच वाटतं. पण, थोडं दु:ख मिळाल्यावर आपल्याला सतत दु:खच मिळत असल्याची भावना प्रबळ होत जाते. म्हणूनच निष्काम बुद्धीने प्रयत्न, कष्ट, आणि कर्म केलं पाहिजे. माणसाला कर्म सुटत नाहीत. ज्ञानी माणसालाही ते चुकत नाही, म्हणूनच प्रत्येकाने आपलं कर्म केलं पाहिजे. पण फळाची आशा टाळायला हवी. कामासाठी कोणतीही लाचलुचपत, भ्रष्टाचार न करता जीवनभर काम करा, हाच संदेश गीतेने आपल्याला दिला आहे. लोकहिताची कामं करताना, ती कोणत्या बुद्धीने केली जातात याला अधिक महत्त्व आहे. उदाहरणार्थ, एखाद्या संस्थेला देणगी देणं हे चांगलं काम आहे. पण ती कोणत्या हेतूने दिली, स्वत:च्या कीर्तीसाठी दिली, स्वत:च्या पापावर पांघरुण पडावं म्हणून दिली की त्या संस्थेवर वचक, वजन रहावं म्हणून दिली? ती कोणत्या लाभासाठी दिली हे पाहूनच सत्कर्म लक्षात घ्यावं. मनात कोणतीच अभिलाषा न ठेवता दिलेलं दान हेच खरं दान आहे. गीता हाच संदेश देते.

अहिंसा किंवा सत्य हे सर्व नीतीधर्म प्राणीमात्रांच्या हितासाठी आहे. लोकांच्या कल्याणासाठीच धर्मशास्त्र स्थापित झालं. संसार करत इतरांप्रमाणे जगातील सर्व व्यवहार विरक्त बुद्धीने करावे असं गीता सांगते. म्हणजेच 'कर्मयोग' हीच गीतेची शिकवण आहे. म्हणूनच भगवान श्रीकृष्ण सांगतात,

'यदा यदा ही धर्मस्य, ग्लानिर्भवती भारत। अभ्युत्थानमधर्मस्य, तदात्मानं सृजाम्यहम्।। परित्राणाय साधूनां, विनाशायच दृष्कृताम। धर्मसंस्थापनार्थाय, सम्भवामि युगे युगे युगे।।'

धर्माला (समाजाला) ग्लानी येते तेव्हा तेव्हा त्यांचा उत्कर्ष करण्यासाठी, मी युगायुगात जन्म घेतो आणि जनहिताची कामं करतो. ती करताना माझ्या मनात आसक्ती नसते. त्यामुळे केलेल्या कोणत्याही कर्माचं पाप-पुण्य मला लागत नाही. निष्काम कर्म करणं हा एक श्रेष्ठ प्रतीचा यज्ञच होय. अनेक युगं, वर्षं लोटली तरी भारतीयांच्या मनात गीतेविषयीचा आदर कायम आहे. पुढेही कायम राहणार आहे. गीतेने आपल्याला जगण्याचं तत्त्वज्ञान दिलं. आधुनिक काळातही या तत्त्वज्ञानाची गरज आहे. गीतेमध्ये काय नाही? ज्ञान आहे, भक्ती आहे, पातंजय योग आहे, संन्यास आहे, वैराग्य आहे. तरीसुद्धा गीता पठण करताना कर्मयोगाचा पुरस्कार दिसून येतो. पूर्ण गीतेत, प्रत्येक अध्यायात एका साखळीतील अनेक दुव्यांप्रमाणे हा कर्मयोग आपल्याला प्रत्येक ठिकाणी सुसंबद्ध केलेला दिसतो.

## कवी, समर्थांच्या नजरेतून...

दासबोधातून...

सर्वसामान्यांच्या कल्पनेपलिकडे जाऊन विचार करण्याची क्षमता असणाऱ्या कवीबद्दल समर्थ रामदास स्वामी गौरवोद्‌गार काढतात. ते म्हणतात,

कवी सृष्टीचा आळंकार। कवी लक्ष्मीचा शृंघार। सकळ सिद्धीचा निर्धार। ते हे कवी। कवी सभेचे मंडण।कवी भाग्याचे भूषण। नाना सुखाचे संरक्षण। ते हे कवी। नस्ता कवीचा व्यापार। तरी कैंचा अस्ता जगदोद्धार। म्हणौनि कवि हे आधार। सकळ सृष्टीसी।



या वर्णनावरुन श्रीसमर्थ कवींची थोरवी वर्णन करताना रंगून गेल्याचं दिसतं. ते म्हणतात, कवी अनेक प्रकारचे छंद, प्रबंध, धाट्या, मुद्रा यांच्या रचना करतात. असे कवी सकल सृष्टीचे अलंकार स्वरुप असतात. वैभवाची अधिष्ठात्री देवता जी लक्ष्मीमाता, तिने विविध मनमोहक दागिन्यांनी केलेल्या शृंगाराप्रमाणेच ही कवी मंडळी आपलं आयुष्य शृंगारून ते संपन्न करत असतात. चांगल्या विचारांचे प्रत्यक्ष कृतीशील निर्धारामध्ये रुपांतर करण्यास त्याचं प्रभावी शब्दसामर्थ्य पुरेसं असतं. तेच ऋषीमुनींचं महत्त्व सामान्यजनांना दाखवून देण्यासही समर्थ असतात. कवी म्हणजे अनादि ब्रह्माची खरी संपत्ती आणि त्याच वेळी विराट विश्वरुपाची योगसिद्ध अवस्था सुद्धा आहेत. सततच्या भक्तीमुळे फळस्वरुप म्हणून जी परम शांती प्राप्त होते तिचंच कवी हे प्रत्यक्ष रूप म्हणावं लागेल.

## दु:ख समजून घेताना...

स्वसाह्य

दु:ख, समस्या मनुष्य जीवनाचा एक भाग आहे. प्रत्येकाच्या आयुष्यात सुख आणि दु:ख येत असतं. दु:ख, समस्या आल्यावर आपण अस्वस्थ होतो. अशा परिस्थितीत काय करावं, हे कळत नाही. यामुळे नैराश्य येण्याची शक्यता असते. पण काही गोष्टी लक्षात ठेऊन आपण हा काळ आनंदात व्यतित करु शकतो. आयुष्यात



दु:ख किंवा समस्या असेल तर नेमकं काय करावं याविषयी...

* एखादी समस्या किंवा दु:ख फार काळ टिकणार नाही, यासाठी प्रयत्न करा. समस्या लवकरात लवकर सोडवण्यासाठी झटा. दु:खातून लवकर बाहेर पडा. समस्या किंवा दु:ख फार काळ टिकून राहिलं तर आयुष्य नकारात्मक बनतं. इथूनच ताणतणाव-ाला सुरूवात होते. त्यामुळे आयुष्यातल्या समस्या लवकर दूर करायला हव्या.

* तणाव कमी काळासाठी, वरवरचा असेल तर तुम्हाला रचनात्मक बदलाच्या संधी मिळू शकतात. पण तो जास्त काळपर्यंत राहिला तर नैराश्य येतं. अर्थातच याचे गंभीर परिणाम भोगावे लागतात.

* काही लोक नकारात्मक परिस्थितीतही सगळं काही आलबेल असल्याचं दाखवतात. आनंदी आणि उत्साही असल्याचा मुखवटा घालून फिरतात तर काही लोकांना प्रचंड नैराश्य येतं. त्यामुळे परिस्थिती कोणतीही असली तरी आपला दृष्टिकोन व्यापक असणं गरजेचं असतं. आनंदी आणि उत्साही राहण्यासाठी शक्य तितके प्रयत्न करत राहायला हवं.

* जन्म ही एक घटना आहे. जन्मामुळे मिळालेली संधी म्हणजे जीवन... जीवनामुळे सृजनाची संधी मिळते.

* आपण मनुष्य म्हणून जन्माला आलो एवढं पुरेसं नाही तर आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक घटनेचा, प्रत्येक दु:खाचा स्वीकार करून पुढे जात राहणं ही खरी कला आहे. म्हणूनच सर्व समस्यांचा आनंदाने स्वीकार करून पुढे जात राहिलं पाहिजे. पूजा, उपासना, गुरूचं सानिध्य हे समस्यांमधून बाहेर पडण्याचे रास्त मार्ग आहेत.

## मूर्ख कोणाला म्हणावं?

धर्मशास्त्रातून...



विदुराने आपल्या शिकवणीत बरंच काही सांगितलं आहे. विदुराने मूर्खांची काही लक्षण सांगितली आहेत. या लक्षणांविषयी...

* कोणतंही ज्ञान नसताना अहंकार बाळ-गणारा, दरिद्री असूनही मोठी स्वप्नं बघणारा आणि कोणतेही परिश्रम, मेहनत न करता श्रीमंत होण्याची इच्छा बाळगणारा मूर्ख मानला जातो.

* आपली कामं सोडून इतरांची कामं करणारा आणि चुकीच्या कामांमध्ये मित्रांना साथ देणारा माणूस मूर्ख असतो, असं विदुराचं म्हणणं आहे.

* चुकीच्या गोष्टींची इच्छा बाळगणारा, योग्य गोष्टींकडे पाठ फिरवण-ारा आणि स्वत:पेक्षा बलवान माणसासोबत शत्रुत्व बाळगणारा मूर्ख असतो.

* शत्रुला मित्र बनवण-ारा, मित्रांबाबत मनात ईर्ष्या बाळगणारा आणि चुकीचं कर्म करणारा मूर्ख मानला जातो.

* आपल्या कामांची रहस्य उघड करणारा, प्रत्येक गोष्टीत संशय बाळगणारा, साध्या साध्या कामांमध्ये वेळ दवडणारा माणूस मूर्ख असतो.

* पितरांचं श्राद्ध न करणारा, पूजा न करणारा आणि चांगल्या लोकांशी मैत्री न करणारा मूर्ख असतो.

* आमंत्रणाशिवाय एखाद्या ठिकाणी जाणारा, बडबड करणारा आणि विश्वासाला पात्र नसणाऱ्या लोकांवर विश्वास ठेवणारा मूर्ख मानला जातो.

* स्वत:च्या चुकांचं खापर इतरांच्या माथी फोडणारा, अक्षम असूनही राग-वणारा मूर्ख असतो.

* कोणत्याही कारणाशिवाय इतरांना शिक्षा देणारा, अज्ञानी लोकांप्रती प्रेम बाळगणारा आणि कंजूस लोकांच्या आश्रयाला जाणारा मूर्ख असतो. हा मुर्खपणा टाळावा.

## तुळशीपत्र तोडताना...

मंत्रजागर



घरात तुळशी वृंदावन असणं शुभ मानलं जातं. हिंदू धर्मात तुळशीला देवतेचा दर्जा देण्यात आला आहे. तुळस अत्यंत पवित्र मानली जाते. म्हणूनच तुळशीची पानं तोडताना विशिष्ट मंत्र म्हणणं गरजेचं असतं. या मंत्राविषयी आणि तुळशीच्या पूजनाबाबतच्या नियमांविषयी माहिती करून घेऊ या...

* मातस्तुलसि गोविन्द हृदयानंद कारिणी। नारायणस्य पूजार्थं चिनोमि त्वां नमोस्तुते।।

तुळशीची पानं तोडताना हा मंत्र म्हणायला हवा.

* अमावस्या, चतुर्दशी, रविवार आणि शुक्रवारी तुळशीची पानं तोडू नये. सप्तमीला तुळशीची पानं तोडणं अशुभ मानलं जातं. तुळशीची पानं तोडण्याआधी तुळशी मातेची परवानगी घ्यायला हवी. तुळशीची पानं उगाचच तोडू नये.

* वायूपुराणातही तुळशी पत्र तोडण्याबाबत सांगण्यात आलं आहे. वायूपुराणानुसार अस्न-ात्वा तुसलीं छित्वा य: पूजा कुरूते नर:। सोपराधी भवेत सत्यं तत सर्व निष्फलं भवेत। याचा अर्थ असा की, स्नान करण्याआधी तुळशीपत्र तोडून मग पूजा करणारा मनुष्य अपराधी मानला जातो.

## मंदिरं दानवांची

स्थथानमहात्म्य

हिंदू धर्मामध्ये देवांप्रमाणे दानवांचंही अस्तित्त्व मान्य केलेलं आहे. या दानवांनी सर्वसामान्यांना त्रास दिलाच मात्र देवतांनाही सोडलं नाही. या दानवांच्या नाशासाठी विविध देवी-देवतांनी अवतार घेतले. असं असलं तरी देवतांसोबतच काही दानवांची, वाईट प्रवृत्तीच्या व्यक्तिमत्त्वांची मंदिरंही अस्तित्त्वात आहेत. अशाच काही मंदिरांविषयी जाणून घेऊ या...

* उत्तराखंडमधल्या नेटवारमध्ये दुर्योधनाचं मंदिर आहे. या ठिकाणी देवतेप्रमाणे दुर्योधनाची पूजा केली जाते. या मंदिरात भक्त मोठ्या संख्येने येतात. मंदिरापासून काही अंतरावर कर्णाचं मंदिरही आहे.

* उत्तर प्रदेशातल्या गोकुळात पुतना या राक्षसीचं मंदिर आहे. या राक्षसीने आपलं दूध पाजून




कृष्णाला मारण्याचा प्रयत्न केला होता. या ठिकाणी पुतनेची झोपलेल्या अवस्थेतली मूर्ती असून श्रीकृष्ण स्तनपान करतो आहे. श्रीकृष्णाला मारण्याच्या हेतूने का असेना, पण पुतनाने आईचं रूप धारण केलं होतं. त्यामुळे याठिकाणी तिला आईच्या रूपात पूजलं जातं.

* उत्तर प्रदेशातल्या कानपूरमध्ये दशानन मंदिर आहे. इथे रावणाची पूजा केली जाते. इथे रावणाला शक्तीचं प्रतीक आणि ब्राह्मण मानलं जातं. १८९० मध्ये हे मंदिर बांधण्यात आलं होतं, असं म्हणतात.

* उत्तर प्रदेशातल्या झांशीमध्ये अहिरावणाचं एक मंदिर आहे. अहिरावणाने राम-लक्ष्मणाचं अपहरण करून त्यांना पाताळात नेलं होतं. इथे अहिरावणासोबत महिरावणाची पूजा केली जाते. तसंच इथे हनुमानाचीही मोठी मूर्ती आहे.

## शिकवण संतोबांची...

आत्मबोध



आपण छोट्या छोट्या गोष्टींमुळे रागा-वतो. आपल्याला अनेक गोष्टींची किंमत नसते. राग आला की आपण ताटातलं अन्न भिरकावून देतो. पण प्रत्यक्षात जे मिळतंय त्याबाबत कृतज्ञता व्यक्त करायला हवी. संत संतोबा पवार यांनी एका शिष्याला हीच शिकवण दिली. यातून आपल्यालाही काही शिकता येईल. ही कथा अशी की, एक माणूस कायमच बायकोवर चिडत असे. माझं ऐकलं नाही तर संत संतोबांचा शिष्य होईन, संन्यासी जीवन स्वीकारेन, अशी धमकी देत असे. यामुळे पत्नी खूपच वैतागली होती. एके दिवशी संत संतोबा भिक्षा मागण्यासाठी त्या माणसाच्या घरी आले. त्यावेळी तो मनुष्य घरी नव्हता. संतोबांना पाहताच त्याच्या पत्नीने पतीची विक्षिप्त वागणूक त्यांच्या कानी घातली. त्यावर संतोबा म्हणाले की, पुढच्यावेळी त्याने असं म्हटलं की खुशाल जायला सांग. मी त्याला धडा शिकवतो.

दुसऱ्या दिवशी तो मनुष्य घरी आला. जेवण तयार नसल्याचं बघून तो खूप वैतागला. मी घर सोडून संन्यास घेईन, असं म्हणू लागला. खुशाल जा, असं पत्नी म्हणाली. यामुळे तो वैतागून तडक संत संतोबांच्या आश्रमात आला. मला संन्यास घ्यायचा असल्याचं त्याने संतोबांना सांगितलं. मग संतोबांनी त्याला लंगोट बांधायला दिला. लंगोट घातल्यानंतर त्या माणसाला खूप थंडी वाजू लागली. आश्रमात दुपारच्या जेवणात कंदमुळं खायला मिळाली. ती बेचव कंदमुळं त्याच्या घशाखाली उतरेना. कंदमुळं न खाल्ल्याने त्याला खूप भूक लागली. पोटात कावळे ओरडू लागले. त्याला बघून संतोबा म्हणाले, संन्याशी जीवनात अनेक गोष्टींचा त्याग करावा लागतो. जीभेवर नियंत्रण ठेवणं ही संन्यासी जीवनाची पहिली पायरी आहे. याच पायरीवर तू गडबडलास. त्यामुळे घरी जा. इतरांची सेवा कर. तू गृहस्थ संत म्हणून लोकप्रिय होशील. ही व्यक्ती म्हणजेच प्रसिद्ध संत नरोत्तम राव.

## घुमटामागील वैज्ञानिक कारण

जाणून घ्या

मंदिर ही प्रार्थनेसाठी योग्य असणारी एक पावन वास्तू असते. याच धर्तीवर मुसलमान मशिदीत, ख्रिस्ती बांधव चर्चमध्ये तर शीख बांधव प्रार्थनेसाठी गुरूद्वारामध्ये जातात. प्रत्येक धर्माचं प्रार्थना स्थळ असतं. प्रत्येक प्रार्थनास्थळाचं एक महत्त्व असतं. या सगळ्या प्रार्थनास्थळांमध्ये एक साम्य आढळतं ते म्हणजे प्रत्येक प्रार्थनास्थळावर घुमट असतो. यामागे वैज्ञानिक कारण आहे. प्रार्थनास्थळाचा वरचा भाग घुमटाकार असण्याचा संबंध प्रार्थनेशी जोडला गेला आहे. याविषयी जाणून घेऊ या...

परमेश्वर चराचरात आहे असं आपण मानतो. त्यामुळे आकाशाखाली बसून आपण देवाची प्रार्थना केली तर निर्माण झालेल्या लहरी या ब्रह्मांडात कुठेतरी हरवून जातात. या लहरी आपल्याकडे परत येत नाहीत. देवाकडे आपण मागणं मागतो. प्रार्थना करताना त्याच्याशी जोडले जातो. यावेळी निर्माण झालेल्या लहरी पुन्हा आपल्याकडे आल्या नाहीत तर प्रार्थनेचे पुरेसे लाभ मिळत नाहीत. हेच लक्षात घेऊन प्रार्थनास्थळाचा वरचा भाग घुमटाकार ठेवला जातो.

या घुमटाकारामुळे तुम्ही केलेली प्रार्थना, म्हटलेले मंत्र यातून निर्माण झालेल्या लहरी त्याच परिसरात राहतात. घुमटाला स्पर्श करून या लहरी भक्तापर्यंत पोहोच-तात. भक्ताला याचे आध्यात्मिक लाभ मिळतात. भक्त भगवंताची अत्यंत मनोभावे पूजा करतो. आपण विचार करतो तसंच चित्र मनात तयार असतं. मनातले हे भाव, तरंग, लहरी संपूर्ण बह्मांडात पसरत असतात. हीच प्रार्थना घुमटाखाली केली तर लहरींचं एक वर्तुळ तयार होतं. या वर्तुळामुळे भक्तांना मिळणाऱ्या अनुभूतीचा आनंद अवर्णनीय असतो. त्यामुळे प्रार्थनास्थळाचा वरचा भाग घुमटाकार असतो.



# लेखक हे शब्दसृष्टीचे शिल्पकार


## भारत बोध सत्रात युवा लेखकांशी डॉ. भागवतांचा मनमोकळा संवाद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

लेखन ही केवळ कला नसून समाजाला दिशा देणारी शक्ती आहे. शब्दांचा अयोग्य वापर झाला तर परिणामही प्रतिकूल होतात. त्यामुळे मानवकल्याण हेच साहित्याचे ध्येय असावे, अशा शब्दांत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी साहित्यनिर्मात्यांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

रेशीमबाग मैदानावर नॅशनल बुक ट्रस्ट, महाराष्ट्र शासन आणि झिरो माईल यूथ फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने भरत असलेल्या नागपूर पुस्तक महोत्सव २०२५ मध्ये शनिवारी भारत बोध : युवा लेखक संवाद या विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले. देशभरातून सुमारे ३०० युवा लेखकांनी या संवादाला हजेरी लावली.

या प्रसंगी राष्ट्रीय पुस्तक न्यासचे अध्यक्ष प्रो. मिलिंद मराठे, झिरो माईल फाउंडेशनचे संचालक प्रशांत कुकडे व्यासपीठावर



उपस्थित होते. डॉ. भागवत यांच्या हस्ते पीएम युवा लेखक श्रेयस कोल्हेकर यांचा सत्कार करण्यात आला.

**साहित्य म्हणजे उन्नतीचे साधन**

डॉ. भागवत म्हणाले की, लेखकाचे सृजन स्वहितापलिकडे समाजहिताचा मार्ग दाखवणारे असते. आपल्या साहित्याचे भाव कोणत्याही इझममध्ये अडकत नाहीत. राष्ट्र हा आपल्यासाठी वादाचा मुद्दा नाही–तो अनुभूतीचा विषय आहे. भारतीय साहित्याचे विविध प्रादेशिक भाषांमधील भावांतर वाढले असले तरी आता ते विदेशी भाषांमध्ये पोहोचण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

**ग्लोबलायझेशन हा केवळ आभास**

सत्रादरम्यान एआय, शिक्षणव्यवस्था, इतिहास, डिजिटल पिढी, जागतिकीकरण अशा ४८ प्रश्नांना उत्तर देताना डॉ. भागवत म्हणाले, ग्लोबलायझेशन हा प्रत्यक्षात एक भ्रम आहे. तो एकमेकांवर विचार लादण्याचा प्रयत्न आहे. त्यामुळे जगभर संघर्ष, युद्धे दिसतात.

खरी जवळीक वसुधैव कुटुंबकमच्या भावनेत आहे, आणि ती भावना भारताची सनातन देणगी आहे, असे त्यांनी नमूद केले.जेन-झी पिढीला उद्देशून त्यांनी राष्ट्राच्या परंपरा मूळ स्रोतांकडून समजून घेण्याचे आवाहन केले. संचालन सुष्मिता सिंग यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रशांत कुकडे यांनी केले.

# ऊर्जामंत्र्यांच्या जिल्ह्यात थकले शेकडो कोटींची वीजदेयके

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :

राज्यात महावितरणच्या वीज देयकांची थकबाकी वाढतच आहे. मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागपूर जिल्ह्यातच वीज देयकाची थकबाकी १०७ कोटींवर पोहचली आहे. त्यामुळे महावितरणकडून आता थकबाकीदारांविरोधात कारवाईची मोहिम आणखी आक्रमक केली जाणार आहे.

महावितरणच्या नागपूर परिमंडळात लघुदाब वर्गवारीतील घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक वर्गवारीतील १ लाख ५६ हजार ७८६ ग्राहकांकडे १२० कोटी ४३ लाख रुपयांची वीज देयकाची थकबाकी आहे. त्यात नागपूर जिल्ह्यातील १ लाख ३२२५१ ग्राहकांकडील १०७ कोटी ३५ लाख तर वर्धेतील २४५३५ ग्राहकांकडील १३ कोटी ८० लाख रुपयांचा वीज देयकांच्या थकबाकीचा समावेश आहे.

थकबाकीदार ग्राहकांमध्ये नागपूर जिल्ह्यातील १ लाख ९ हजार ९ घरगुती, १९ हजार ५०३ वाणिजिक आणि ३ हजार ७३९ औद्योगिक तर वर्धा जिल्ह्यातील २१ हजार ४२३ घरगुती, २ हजार २८० वाणिजिक आणि ८३२ औद्योगिक ग्राहकांचा समावेश आहे.

दरम्यान वीज देयकाच्या वाढत्या थकबाकीमुळे महावितरणने नाईलाजाने वीजबिल भरा, अन्यथा कारवाईला सामोरे जा असा इशारा दिला आहे. ग्राहकांनी त्वरित चालू बिलासह आपली थकबाकी भरून कंपनीला सहकार्य करावे, असे कळकळीचे आवाहन महावितरणने केले आहे.

या वसुली मोहिमेत नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके हे स्वतः सक्रियपणे सहभागी झाले आहेत. त्यांनी उपविभागनिहाय तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या बैठका घेऊन प्रत्येक कर्मचाऱ्याला थकबाकी वसुलीचे स्पष्ट उद्दिष्ट दिले आहे.

अधीक्षक अभियंते, कार्यकारी अभियंते, उपविभागीय अभियंते, शाखा अभियंते आणि तांत्रिक कर्मचारी प्रत्यक्ष ग्राहकांच्या भेटी घेऊन वसुली करत आहेत. थकबाकी भरण्याचे आवाहन करुन देखील प्रतिसाद न देणाऱ्या ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई सर्वत्र मोठ्या प्रमाणात सुरू आहे.

# पथकाने जप्त केली ८ लाखांची रोकड

■ महासागर प्रतिनिधी
जळगाव जामोद, दि.२९ :

शहरात एका वाहनातून येणाऱ्या इसमाकडून आठ लाख रुपयाची रोकड शासकीय स्थिर सर्वेक्षण पथकाने पकडली.

नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहराच्या प्रत्येक प्रवेशव्दारावर शासकीय स्थिर सर्वेक्षण पथके निवडणूक विभागाकडून सज्ज करण्यात आली आहे. या पथकाद्वारे शहरात येणाऱ्या वाहनांची कसून तपासणी करण्यात येत आहे. दरम्यान तुकाराम महाराज प्रवेशद्वारा जवळ दुपारी बारा वाजेच्या सुमारास पिंपळगाव काळे येथून येणाऱ्या वाहनाची तपासणी केली. वाहनामधील सुभाष काकडे यांच्याकडून नायलॉनच्या थैलीत असलेली ८ लाख रुपयांची रोकड पथकाला आढळून आली.

: मुलाखत :
प्रविण बोके

रणांगण नगरपालिकेचे

# प्रभागाच्या सर्वांगिण विकासाचा उद्देश डोळ्यासमोर ठेवून निवडणूक रिंगणात

## शिवसेना (उबाठा)चे अधिकृत उमेदवार सुयोग उत्तमराव खाडे यांची खास मुलाखत

■ अंजनगाव सुर्जी, दि. २९ :



गेल्या निवडणुकीत मी या प्रभागातून निवडणूक लढविली होती. तेव्हा माझ्या डोळ्यासमोर जो प्रभाग विकासाचा संकल्प होता, तो आज नऊ वर्षांनंतरही कायम आहे.

प्रभागाचा विकास आणि स्थानिक मतदारांच्या समस्या सोडवण्यासाठीच मी पुन्हा प्रभाग क्रमांक २ मधून रिंगणात उतरलो आहे. मागील निवडणुकीतील पराभवानंतरही प्रभागातील नागरिकांशी असलेला संपर्क मी कधीच कमी होऊ दिला नाही. त्यामुळे या वेळी विजयाची पूर्ण आशा असल्याचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे नगरसेवक पदाचे उमेदवार सुयोग उत्तमराव खाडे यांनी मुलाखतीत सांगितले.

**आपण यशस्वी इंजिनीअर असताना निवडणूक लढवण्याचे कारण काय?**

■ हो, मी इंजिनीअर असून आपल्या सर्वांच्या आशीवार्दाने व्यवसाय चांगला सुरु आहे. मात्र गेल्या पंचवार्षिकात प्रभागाचा अपेक्षित विकास झाला नाही. जुन्या समस्या आजही पूर्ववत आहेत. त्या समस्या मार्गी लावण्यासाठी आणि लोकांच्या आग्रहास्तव मी निवडणूक रिंगणात उभा आहे.

शिवाय, शिक्षित व्यक्तींनी राजकारणात येणे ही काळाची गरज आहे.

**प्रभागाच्या विकासासाठी आपण कोणती मुख्य उद्दिष्टे निश्चित केली आहेत?**

■ आमचा प्रभाग म्हणजे नव्याने विकसित होणारा नगराचा भाग. परंतु ३०-३५ वर्षांपासून अनेक ठिकाणी आजही रस्ते, नाल्या आणि वीज उपलब्ध नाही. सर्वप्रथम ही प्रलंबित कामे पूर्ण करणे, तसेच प्रभागातून जाणाऱ्या पांढरी वेश नाल्याचे अंडरग्राऊंडकरण करणे, ही माझी मुख्य उद्दिष्टे आहेत.

**एवढी मोठी उद्दिष्टे आपण कशी साध्य करणार?**

■ नगरपरिषदेचा निधी मर्यादित असतो. मात्र सध्या दर्यापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार हे शिवसेना (उबाठा) गटाचे आहेत आणि मतदारसंघाचा विकास हे त्यांचे प्रमुख ध्येय आहे. त्यांनी प्रभागाच्या सर्वांगीण विकासाची हमी मतदारांना दिल्याने ही कामे निश्चित पूर्ण होतील, असा मला पूर्ण विश्वास आहे.

**आपण नगरसेवक झाल्यास नगरपरिषद प्रशासनात कोणते बदल अपेक्षित आहेत?**

■ गेल्या तीन वर्षांपासून नगरपरिषदेमध्ये प्रशासक राज होते. त्यामुळे विस्कळीत झालेली प्रशासनाची घडी सुरळीत करणे हे सर्वप्रथम काम राहील. यात कर्मचारी बांधवांचा सहभागही महत्त्वाचा असेल. शहरातील नागरिकांचे प्रलंबित प्रश्न तात्काळ निकाली काढण्यासाठी योग्य त्या उपाययोजना केल्या जातील.

**शहरातील कोणत्या मुख्य मुद्यावर आपण विशेष लक्ष केंद्रित करणार?**

■ शिक्षण हा माझ्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे. शहरातील सुमारे अर्धी लोकसंख्या मजुरी किंवा शेतीवर अवलंबून आहे. अशा कुटुंबांना खासगी शिक्षण परवडत नाही. त्यामुळे नगरपरिषदेच्या शाळा अधिक सुसज्ज करणे, सक्षम शिक्षकांची नेमणूक करणे, आणि खासगी शाळांपेक्षा उत्तम शिक्षण देणे हे माझे लक्ष्य आहे. यासोबतच घनकचरा व्यवस्थापन, प्रमुख रस्त्यांचा विकास हीही महत्त्वाची कामे प्राधान्याने केली जातील.शहरातील अनेक समस्या वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. त्या सोडवण्यासाठी आणि मतदारांच्या अपेक्षांना न्याय देण्यासाठी मी कटिबद्ध राहीन.

# विकासाचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून निवडणुकीच्या मैदानात

## शिवसेना (उबाठा) यांच्या अधिकृत उमेदवार रुपाली सुधीर देवगीरे यांची विशेष मुलाखत

■ अंजनगाव सुर्जी
दि. २९ :



मी प्रभाग क्रमांक २ मधून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडून निवडणूक लढवत आहे. माझ्या कुटुंबाने शहराच्या सर्वांगीण विकासात मोठे योगदान दिले आहे. स्व. यादवराव देवगीरे माझे आजे सासरे यांनी अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेत नगराध्यक्षपद भूषवले. अनेक वर्षांनंतर देवगीरे कुटुंबातून मला संधी देत विद्यमान आमदार गजानन लवटे यांनी माझ्यावर दाखवलेला विश्वास मी नक्कीच पूर्ण करेन. प्रभागातील प्रलंबित प्रश्न सोडवण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करणार आहे. मतदारांनी मला संधी द्यावी, असे स्पष्ट मत रुपाली देवगीरे यांनी मुलाखतीत व्यक्त केले.

**सुसंपन्न कुटुंबातून असूनही आपण राजकारणात उतरले. यावर आपण काय प्रतिक्रिया द्याल?**

■ होय, मी सुसंपन्न कुटुंबातील असून माझ्या घराण्याला राजकीय वारसा आहे. माझ्या आजे सासऱ्यांनी सहकार क्षेत्रात मोठे कार्य केले. त्यांच्या निधनानंतर कुटुंबातून कुणी राजकारणात आले नाही. मात्र गजाननभाऊ लवाटे यांनी ही संधी आम्हाला दिली असून तिचे सार्थक करण्याचा माझा प्रयत्न असेल.

**प्रभागाच्या विकासासाठी आपली प्राधान्यक्रम यादी काय?**

■ आमचा प्रभाग काहीसा जुना आणि ऐतिहासिक वस्तीचा आहे. पूर्वी अनेक आश्वासने दिली गेली पण पूर्ण झाली नाहीत. यादवराव देवगीरे नगराध्यक्ष असताना सुरू असलेली काही कामे आजही अपूर्ण आहेत. ती पूर्ण करणे आणि मूलभूत सुविधा पुरवणे हा माझा मुख्य हेतू आहे.

**महिला म्हणून निवडणुकीत काही अडचणी येतात का?**

■ आज महिला राजकारणात मोठ्या प्रमाणात पुढे येत आहेत. ५० टक्के आरक्षणामुळे सहभाग वाढला आहे. माझ्या कुटुंबाने व समाजाने कधीही बंधने घातलेली नाहीत.

**सभागृहात गेल्यानंतर पहिले काम कोणते?**

■ महिलांसाठी सुरक्षित व स्वच्छ सार्वजनिक शौचालये, शहरात सीसीटीव्ही कॅमेरे, महिलांसाठी सुरक्षित उद्याने व मुलींकरिता स्पर्धा परीक्षा केंद्र उभारणे, ही माझी प्राथमिक कामे असतील.

**नगरसेवकाचा निधी कमी असतो, एवढा विकास कसा शक्य?**

■ आ. गजानन लवटे आमच्या सोबत आहेत. त्यांच्या वर्षभरातील कामगिरीवर मतदार समाधानी आहेत. त्यांनी शहरातील सर्व उमेदवारांना विकासाचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे विकासकामे नक्कीच पूर्ण होतील, असे आत्मविश्वासपूर्वक सांगत आहे.